सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २६५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २२ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## काँग्रेस हायकमांडचा आदेश काहीही असो, शिवसेना-मनसे आधीच एकत्र

### कुणाच्या परवानगीची गरज नाही; संजय राऊतांचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२मुंबई**

महापालिका निवडणुकीसाठी मनसेला महाविकास आघाडीत घ्यायचं की नाही यावरुन काँग्रेसमध्ये मतमतांतरे आहेत. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी मनसेसोबत जाण्यास नकार दिल्याचं दिसतंय. तर विजय वडेट्टीवार यांचा मात्र मनसेला सोबत घेण्याकडे कल आहे. राष्ट्रवादीचे शरद पवारही मनसेला सोबत घेण्याविषयी सकारात्मक दिसतात. अशा वेळी काँग्रेसने घेतलेल्या भूमिकेवर ठाकरेंचे खासदार संजय राऊत यांनी टीका केल्याचं दिसतंय.

काँग्रेसचा निर्णय काहीही असो, मुंबई महापालिका निवडणूक दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येऊन लढवणार असल्याचं संजय राऊत यांनी स्पष्ट केलं आहे. त्यासाठी इतर लहान पक्षांचाही पाठिंबा असल्याचं ते म्हणाले. दुसरीकडे, मनसेला महाविकास आघाडीमध्ये घेण्यासाठी




आपण सकारात्मक असल्याचं शरद पवारांनीही स्पष्ट केलं आहे. त्यामुळे संजय राऊतांच्या या भूमिकेनंतर आता मुंबई काँग्रेसचे नेते काय भूमिका घेतात याकडे लक्ष आहे.

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत काँग्रेसने 'एकला चलो'ची भूमिका घेतली आहे. मात्र काही ठिकाणी स्थानिक नेत्यांनी मनसेसोबत आघाडी केल्याचे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवारांनी सांगितले. त्यामुळे मनसेसोबत जाण्याचे संकेत वडेट्टीवारांनी दिले आहेत. शरद पवारांप्रमाणे मलाही आघाडी करूनच लढावे, विचार जुळत नसले तरी भाजपविरोधात सगळ्यांनी एकत्र यावं असेही विजय वडेट्टीवार म्हणाले.

शिवसेना आणि मनसे हे आधीपासूनच एकत्र आले आहेत, ही लोकांची इच्छा असल्याचं मत संजय राऊत यांनी व्यक्त केलं. दिल्लीतून आदेश आल्याशिवाय मनसेला सोबत घेणार नाही हा काँग्रेसचा निर्णय वैयक्तिक असल्याचंही ते म्हणाले.

शिवसेना आणि मनसे एकत्रच असून त्यासाठी आम्हाला कुणाचा आदेश किंवा कुणाच्या परवानगीची गरज नसल्याचं थेट मत संजय राऊत यांनी व्यक्त केलं. शरद पवार आणि डावे पक्षसोबत मुंबई वाचवण्यासाठी आमच्यासोबत आहेत असंही संजय राऊत म्हणाले.

## नवाब मलिक असलेल्या युतीत सहभागी होणार नाही

### भाजपाच्या भूमिकेमुळं महायुतीत फूट?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२मुंबई**

मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर महायुतीमध्ये सारे काही आलबेल नसल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. अजित पवारांच्या नेतृत्त्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसनं मुंबईची कमान पुन्हा एकदा नवाब मलिक यांच्याकडे सोपवल्यामुळं भाजपानं विरोधाचा सूर आळवला आहे. नवाब मलिक असतील तर आम्ही युतीत नाही, अशी स्पष्ट भूमिका भाजपानं घेतल्यामुळं महायुतीत फूट पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एकीकडे महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसनं स्वबळाची घोषणा करून आघाडीला तडा दिला असताना, दुसरीकडे आता महायुतीतही नवाब मलिकांवरून दुभंग होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भाजपाच्या मुंबईतील बड्या नेत्यांनी नवाब मलिकांना युतीत सामावून घेण्यास ठाम नकार दिला आहे. मुंबई उपनगरचे पालकमंत्री तथा भाजपा नेते आशिष शेलार यांनी यासंबंधी खुलासा करताना म्हटलं की, नवाब मलिक यांच्यावर अत्यंत गंभीर स्वरूपाचे आरोप आहेत. कोर्टानंही त्यासंबंधी निर्देश दिलेले आहेत. जोपर्यंत त्यांची या आरोपांतून पूर्णपणे निर्दोष मुक्तता होत नाही, तोपर्यंत आम्ही त्यांच्यासोबत कोणतेही व्यासपीठ शेअर करणार नाही. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत नवाब मलिक यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीसोबत युती करणं, आम्हाला मान्य नाही. ही आमची ठाम भूमिका असून ती आम्ही पक्षश्रेष्ठींनाही कळवली आहे, असंही त्यांनी सांगितलं.

## ११ वर्षीय शाळकरी मुलावर बिबट्याचा भीषण हल्ला, दप्तरामुळे वाचला जीव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२पालघर**

विक्रमगड तालुक्यातील उटावली आदर्श विद्यालयात शिकणाऱ्या ११ वर्षीय विद्यार्थ्यावर बिबट्याचा भीषण हल्ला झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.तर विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या तात्काळ धाडसामुळे मोठी दुर्घटना टळली असून परिसरात या मुलांच्या धैर्याचे कौतुक होत आहे.पीडित विद्यार्थी मयंक विष्णु कुवरा (वय ११, इयत्ता ५वी) हा संध्याकाळी शाळा सुटल्यानंतर माळा पाडवीपाडा येथे परतत होता.

शाळेतून घर ४ किमी अंतरावर असल्याने तो नेहमीप्रमाणे जंगलरस्त्याने चालत जात असताना अचानक बिबट्याने त्याच्यावर झडप घातली.हल्ल्यात बिबट्याचे वार थेट मयंकच्या दफ्तरावर झाल्याने त्याचा जीव थोडक्यात वाचला.मात्र नखांमुळे मयंकच्या हातावर खोल जखमा झाल्या. अचानक झालेल्या हल्ल्यानंतरही मयंकने आरडाओरड करत प्रतिकार केला, तर त्याच्यासोबत असलेल्या मुलाने दगडफेक केली. त्यानंतर जवळील नागरिक घटना स्थळी धावत येताच बिबट्या जंगलात पसार झाला.

या परिसरात मागील काही दिवसांपासून बिबट्या फिरत असल्याची चर्चा होती. गावकऱ्यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट करून सावधगिरीचा इशारा दिला होता. तरीही शाळकरी मुले जंगलातूनच



प्रवास करत असल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जखमी मयंकवर विक्रमगड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून खोल जखमेवर टाके घेण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली.

घटनेनंतर नागरिकांनी वनविभागाने तातडीने पावले उचलावीत, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळा परिसर आणि जंगल पट्ट्यात गस्त वाढवावी तसेच मुलांच्या ये-जा मार्गावर सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करावी, अशी मागणी केली आहे.या प्रसंगी बिबट्याला पळवून लावणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कठोर हिमतीचे आणि पराक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे

## संपूर्ण राज्यात शेकडो अवैध 'पॅथॉलॉजी लॅब'

### बोगस लॅबविरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२ नागपूर**

राज्यात शेकडो अवैध 'पॅथॉलॉजी लॅब'असून त्यातून बोगस अहवाल तयार होऊन रुग्णांच्या आरोग्याशी नेहमी खेळ होत आहे. बोगस लॅबवर कारवाई न केल्यास शेकडो रुग्णांच्या जिवावर बेतू शकते. हीच बाब हेरुन यवतमाळचे दिगंबर पचगडे यांनी यवतमाळसह संपूर्ण महाराष्ट्रातील 'अवैध पॅथॉलॉजी लॅब' विरोधात तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीकरिता उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. न्यायालयाने राज्याच्या प्रधान सचिवांसह इतर प्रतिवादींना नोटीस बजावली. तसेच न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश व्यास यांनी सर्व प्रतिवादींना येत्या ७ जानेवारीपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश दिलेत.

दिगांबर पचगडे यांनी उच्च न्यायालयात फौजदारी जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकेत नमूद केल्यानुसार, रुग्णांच्या जीवावर परिणाम करणाऱ्या या अवैध पॅथॉलॉजी लॅबबद्दल प्रतिवादींना माहिती देऊनही त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

## १३२ वनपालांची पदोन्नती रखडली

### वनक्षेत्रपाल नियुक्तीची फाइल मंत्रालयात अडकली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती**

राज्याच्या वन विभागात १३२ वनपालांना बहुप्रतीक्षेनंतर पदोन्नती देण्याचा निर्णय झाला आहे. त्याअनुषंगाने यादीदेखील प्रसिद्ध करण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात अद्यापही वनपालांना वनक्षेत्रपालपदी पदोन्नती नियुक्ती मिळालेली नाही. गत वर्षभरापूर्वी पदोन्नत समितीची बैठक पार पडली होती. त्यानंतर संबंधित वनपालांच्या पदोन्नतीवर शिक्कामोर्तबही झाले. तथापि, पदोन्नतीची फाईल वन सचिवालयात प्रलंबित असल्याची विश्वसनीय माहिती आहे.

राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख)




एम. श्रीनिवास राव यांनी १० ऑक्टोबर २०२५ रोजी १३२ वनपालांना वनक्षेत्रपाल म्हणून पदोन्नती देण्यासाठी संबंधित महसूल विभाग (झोन) घोषित केले. त्यानुसार पदोन्नती निवड समितीची बैठक घेऊन पुढील कार्यवाहीचा प्रस्ताव वनमंत्रालयाकडे पाठविण्यात आला आहे. घोषित झालेल्या महसूल विभागानुसार या वनपालांना त्वरित वनक्षेत्रपाल पदावर नियुक्ती मिळणे अपेक्षित होते. मात्र, वन सचिवालयातील कारभारातील मनमानीमुळे ही कार्यवाही रखडल्याची जोरदार नाराजी व्यक्त केली जात आहे.

राज्यभरात वन परिक्षेत्र अधिकारी पदांच्या २२६ जागा रिक्त आहेत. अशातच मानव-वन्यजीव संघर्ष हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्यभर २२६ वन परिक्षेत्र कार्यालये, वन परिक्षेत्र अधिकारीविना असल्याने या वन परिक्षेत्रातील वन कर्मचाऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही, तसेच वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांअभावी वने आणि वन कर्मचाऱ्यांवर नियंत्रण नसल्याने हा प्रश्न मागील वर्षभरापासून भेडसावत असून, त्याचे दुष्परिणाम राज्य भोगत आहे.

**नागरी सेवा मंडळाची बैठक पुढे ढकलली**

वन विभागाने १३२ पात्र वनपालांना वनक्षेत्रपाल संवर्गात पदोन्नती देण्याकरिता महसुली विभाग वाटपसुद्धा केले आहे. त्याअनुषंगाने मुंबई येथे मंत्रालयात ७ नोव्हेंबर रोजी पदोन्नतीसंदर्भात नागरी सेवा मंडळाची बैठक पार पडणार होती; परंतु ४ नोव्हेंबरपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमामुळे सदर बैठक रद्द झाली, हे विशेष.

तर दुसरीकडे वनपाल ते वनक्षेत्रपाल संवर्गात पदोन्नती देण्याकरिता निवडणूक आयोगाने आता परवानगी दिली आहे. त्यामुळे वनपाल ते वनक्षेत्रपाल संवर्गात पदोन्नती देण्याकरिता कोणतीही अडचण राहिली नाही; परंतु राज्यात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात माणसांचा बळी जात असतानासुद्धा वन विभाग कुंभकर्णी झोपेत आहे.

## कमी बजेट असल्याचं सांगत आपल्या लाडक्या बहिणींना उन्हात बसवू नका - चंद्रशेखर बावनकुळे

### मी स्टार प्रचारक, खर्चाची चिंता तुम्ही करू नका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२गडचिरोली :**

भाजपच्या प्रचार सभेसाठी आलेल्या महिला उन्हात बसल्याचं दिसताच राज्याचे मंत्री आणि भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपचे गडचिरोली जिल्हाध्यक्ष रमेश बारसागडे यांचे कान टोचले. , मी स्टार प्रचारक आहे, तुम्ही खर्चाची



चिंता करू नका असं बावनकुळे म्हणाले. मी राज्यावर आहे, निवडणूक आयोगाला आम्ही हिशोब देऊ असंही ते म्हणाले.

गडचिरोलीत भाजपच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन आणि प्रचार सभा पार पडली. यावेळी काहीजण उन्हामध्ये बसल्याचं दिसून आलं. तेव्हा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाध्यक्षांचे कान टोचत मंडप पूर्ण नाही टाकला, याबाबत विचारणा केली.

**आयोगाला मी खर्चाचा हिशोब देतो**

निवडणूक आयोगाला आपण हिशोब देऊ, तुम्ही हिशोबासाठी घाबरू नका. तुम्ही एक पडदा टाकला तर आपण तो ५० रुपयाचा असल्याचं सांगू. मी स्टार प्रचारक आहे. कशाला हिशोब लागतो? मी राज्यावर आहे, राज्यात आम्ही हिशेब देऊ. मात्र आमच्या लाडक्या बहिणी उन्हात बसवू नये असे म्हणत बावनकुळेंनी जिल्हाध्यक्ष रमेश बारसागडे यांचे कान टोचले.

## जिल्हा परिषदेच्या वऱ्हा सर्कलमध्ये काँग्रेसने उमेदवारी शिरजगाव मोझरीत द्यावी

### सर्वपक्षीय बैठकीत गावकऱ्यांचा सुर; सर्व राष्ट्रीयकृत पक्षाकडून शिरजगाव मोझरीत उमेदवारी न देता अन्याय केला जात असल्याची आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२ शिरजगांव मोझरी**

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत शिरजगाव मोझरी गावातील नागरिकांनी काँग्रेसपुढे आव्हान निर्माण केले आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून काँग्रेसने शिरजगाव मोझरी गावात उमेदवारी दिली नसल्याने यावेळी खुला प्रवर्गासाठी गावाने प्रबळ दावेदारी ठोकली आहे. शिरजगाव मोझरी येथील सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांच्याकडे उमेदवारी मागितली असून, त्यासाठी गावातील सर्वपक्षीय नेत्यांसह नागरिकांनी एकमताने गावात उमेदवारी देण्याची मागणी करण्याच्या निश्चय केला आहे. शुक्रवारी गावात पार पडलेल्या बैठकीत गावकऱ्यांनी एकमताचा सुर दिला आहे.

आतापर्यंतच्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसने मोझरी किंवा गुरुदेव नगरात दिलेल्या उमेदवाराचा गेल्या १५ वर्षात पराभवच झाला आहे. त्याचा अप्रत्यक्ष फायदा प्रहारचे उमेदवार संजय देशमुख यांना होत आहे. सलग तीन पंचवार्षिक काँग्रेसचा चुकीचा उमेदवार आणि चुकीच्या राजकीय समीकरणामुळे प्रहारला संधी मिळत आली आहे. गेल्या निवडणुकीत सुद्धा गौरी देशमुख यांना शिरजगाव मोझरीने १५०० मते प्रहारला दिले होते. तर काँग्रेसला फक्त १७९ मतांवर समाधान मानावे लागले होते. त्यापूर्वी वर्हा जिल्हा परिषद सर्कल अनुसूचित जाती राखीव असताना प्रा. चंद्रपाल तुरकाने आणि विनोद



हगवणे यांनी काँग्रेसला उमेदवारी मागितली होती. मात्र, काँग्रेसने दोघांनाही उमेदवारी नाकारून त्यावेळी राष्ट्रवादीतून नुकतेच काँग्रेस प्रवेश झालेले तिवसा शहरातील दिलीप काळबांडे यांना आयात केले होते. परिणामी याची संधी साधून प्रहारने त्यावेळी शिरजगावातील प्रा. चंद्रपाल तुरकाने यांना उमेदवारी दिली होती. त्याचा परिणाम शिरजगाव मोझरी गावाने निपक्ष होऊन संपूर्ण गावाने बहुमत दिले होते.

त्यामुळेच यावेळी शिरजगाव मोझरीतील काँग्रेस नेत्यांसह गावकऱ्यांनी एकमताने यावेळी पुन्हा एकदा गावातीलच उमेदवार जिल्हा परिषदेला उभा करण्याच्या निश्चय केला आहे. काँग्रेसने यावेळीतरी गावात उमेदवारी द्यावी अशी मागणी शिरजगावातील सर्वपक्षीय गावकऱ्यांनी केली आहे. त्यासाठी शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता शिरजगाव मोझरी गावात चर्जन सभागृहात येथे सर्वपक्षीय गावाची बैठक पार पडली असून, गावातील उमेदवारासाठीच राष्ट्रीयकृत पक्षांनी तिकीट नाकारल्यास अपक्ष किंवा इतर कोणत्याही पक्षाची उमेदवारी घेऊन प्रस्थापित धनाढ्य उमेदवारांच्या विरुद्ध मैदानात उतरण्याचा तयारी शिरजगाव मोझरीच्या गावकऱ्यांनी दाखवली आहे.

**तुरकाने पॅटर्न यावेळी चालणार**

१० वर्षांपूर्वी काँग्रेसने प्रा.चंद्रपाल तुरकाने आणि विनोद हगवणे यांना तिकीट नाकारली होती. तिवसा येथून आयात उमेदवाराला वर्हा सर्कल मध्ये काँग्रेसची उमेदवारी दिली होती. परिणामी शिरजगाव मोझरी गावात तुरकाने यांना एकमताने बहुमत दिले होते. तर सर्कल मधील सर्व गावांमध्ये बहुमत मिळाले होते. तीच परिस्थिती यावेळी पुन्हा दिसत असून, काँग्रेसने यावेळी सुद्धा शिरजगावात उमेदवारी नाकारल्यास तुरकाने पॅटर्न चालण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय ......

# पुन्हा नितीश कुमार!

व्होटचोरी, निवडणूक आयोगाचा पक्षपातीपणा आणि लोकशाहीचा संकोच या नेहमीच्या आरोपांकडे दुर्लक्ष करत, बिहारमधील जनतेने भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजेच 'एनडीए'ला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. राजकारणातील एका यशस्वी प्रयोगावर नव्याने शिक्कामोर्तब केले. जेडीयूचे नेते आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणुका लढवण्यात आल्या. ८९ जागांसह सर्वात मोठा पक्ष भाजप ठरला तर जेडीयूला ८५, लोकजनशक्ती पक्षाच्या १९, हिंदुस्थानी अवामी मोर्चाच्या पाच आणि राष्ट्रीय लोक मोर्चाच्या चार जागा आल्या. महागठबंधनचा खुर्दा उडाला. काँग्रेस आणि आरजेडीत आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. लालूप्रसाद यादव यांच्या आरजेडीमध्ये आणि घरातही यादवी माजली. या पक्षाचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार तेजस्वी यादव यांच्यावर कुटुंबातूनच तोफ डागली गेली. विरोधी आघाडीची ही स्थिती. नितीश कुमार यांना निवडणुकीपूर्वीच भाजपने शब्द दिला होता आणि तो पाळला गेल्यामुळे ते दहाव्यांदा मुख्यमंत्री बनले. स्वातंत्र्योत्तर काळात इतक्या वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ इतर कोणीही घेतली नसेल. महाराष्ट्रात वसंतराव नाईक दीर्घकाळ मुख्यमंत्रिपदी होते आणि गुजरातमध्ये नरेंद्र मोदी यांनी २००१ पासून ते २०१४ पर्यंत सलगपणे पद भूषवले. ज्या ऐतिहासिक गांधी मैदानावर लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांतीचा नारा दिला, तिथेच पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि विविध राज्यांचे मुख्यमंत्री व अन्य नेत्यांच्या उपस्थितीत नितीश कुमार यांनी शपथ घेतली. या सोहळ्यास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. नितीश कुमार यांचे हे यश उल्लेखनीय याचसाठी की, त्यांनी राज्यात आपल्या पक्षाची वाढवलेली ताकद. भाजपसोबत युती टिकवताना त्यांनी राजकीय शहाणपण आणि चातुर्य दाखवलेच; विरोधकांचे पानिपत करण्यात त्यांचा वाटाही तितकाच महत्त्वाचा ठरला. त्यांना मुख्यमंत्रिपदावर पुन्हा संधी देत भाजपच्या नेतृत्वाने त्यांचे हे राजकीय योगदान मान्य करण्याचा मोठेपणा दाखवला. पुन्हा सत्ता आणण्याबरोबर जनाधार टिकवणे आणि नितीश कुमार यांना सोबत ठेवण्याचे आव्हान भाजपने पेलले. त्यामागे जेडीयूशी असलेली भक्कम युती होती हे नाकारता येणार नाही.नितीश कुमार आजारी असून, त्यांना स्मृतिभंश झाला आहे, विधानसभा निवडणुकीनंतर त्यांना निवृत्त करण्यात येईल आणि त्यांचा पक्ष संपुष्टात येईल, अशा अनेक अफवा महागठबंधनच्या छावणीतून पसरवण्यात आल्या. प्रत्यक्षात महाराष्ट्रात ज्याप्रमाणे एकनाथ शिंदे यांची शिवसेना संपेल किंवा भाजप या पक्षाला खाऊन टाकेल, हा प्रचार खोटा ठरला, त्याचप्रमाणे बिहारमध्येही जेडीयू व नितीश कुमार यांच्या विरोधातील प्रचार तथ्यहीन असल्याचे स्पष्ट झाले.आणी बाणीविरोधी लढ्यातील जयप्रकाश नारायण यांचे एक शिलेदार नितीश कुमार पन्नास वर्षांनंतरदेखील राजकारणात 'रेलेव्हंट' राहिले आहेत, हे त्यांचे वैशिष्ट्य. अत्यंत मवाळ आणि सभ्य चेहर्‍याच्या नितीश कुमार यांना बिहारमध्ये 'राजकारणातील अमोल पालेकर' असे म्हटले जाते! जेपींच्या या चळवळीतील त्यांचे समाजवादी सहकारी लालूप्रसाद यादव आता थकले असून संदर्भहीनदेखील होत आहेत. लालूंची प्रतिमा चारा घोटाळा करणार्‍या भ्रष्ट राजकारण्याची असून त्यांच्या काळात बिहारमध्ये 'जंगलराज' होते. नितीश कुमार यांनी वेळोवेळी पलटी मारली होती. त्यामुळे त्यांच्या विश्वासार्हतेला तडा गेला होता. तरीदेखील त्यांचे सकारात्मक राजकारण थांबलेले नव्हते. लालूंबरोबर जाण्यात आपली चूक झाली, याची मोकळेपणाने त्यांनी कबुलीही दिली होती. लोकसभा निवडणुकीपूर्वी काही काळ नितीश कुमार यांनी भाजपविरोधात इंडिया आघाडी बांधण्यात महत्त्वाची भूमिका निभावली होती. परंतु या आघाडीचे नेतृत्व त्यांच्याकडे देण्यात काँग्रेसने टाळाटाळ सुरू केल्याबरोबर नितीश कुमार यांनी सफाईने आपला रस्ता बदलला. बिहारमधील 'माफियाराज' त्यांनी संपवले, त्याचप्रमाणे दारूबंदीचे धोरण बर्‍यापैकी यशस्वी केले. यामुळे महिलांना घराबाहेर आणि घरातदेखील अधिक सुरक्षित वाटू लागले. बिहारमध्ये ग्रामपंचायतींपासून सर्व स्तरांवर महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याचे क्रांतिकारी पाऊल नितीश कुमार यांनी खूप पूर्वीच टाकले होते. मुख्यमंत्री महिला रोजगार योजना राबवायला सुरुवात केलीच; परंतु २०१८ सालीच 'दीदी की रसोई' योजनेअंतर्गत हजारो महिलांना सक्षम करण्यात आले. मुलींना सायकली देऊन शाळांमधील गळती कमी करण्यात आली. रस्त्यांचे जाळे तयार करण्यात आले. हे सर्व उपक्रम राबवत असताना नितीश कुमार यांना राज्यात आणि केंद्रात भाजपचे सहकार्य मिळत होते. मोदी सरकारच्या काळात तर या राज्याला मोठे आर्थिक पॅकेज देण्यात आले आणि प्रादेशिक अस्मिता जपली जाईल, याचे भानही ठेवले गेले. भाजपच्या विधिमंडळ दलाच्या बैठकीत सम्राट चौधरी यांची नेतेपदी आणि विजय सिन्हा यांची उपनेतेपदी निवड झाली. विविध घटक पक्षांचे संतुलन ठेवत मंत्रिमंडळाची रचना केली जाणार, हे स्पष्टच होते. नितीश कुमार इलेक्ट्रिकल इंजिनिअर असून, त्यांना सुरुवातीच्या काळात 'इंजिनिअरबाबू' म्हणून संबोधले जात असे. 'नितीश कुमार द राइझ ऑफ बिहार' या पुस्तकात त्यांचे वर्गमित्र असलेल्या अरुण सिन्हा यांनी 'नितीश कुमार हे राज कपूरच्या चित्रपटांचे चाहते होते', असा उल्लेख केला आहे. अर्थात असे असले तरी राजकारणात ते 'अनाडी' नाहीत! जॉर्ज फर्नांडिस आणि लालू यांच्या सावलीत राजकारणाचा श्रीगणेशा करणार्‍या नितीश कुमार यांनी काळाची पावले ओळखत, १९९६ सालीच भाजपबरोबर युती केली. त्यावेळी जॉर्ज व नितीश यांच्या नेतृत्वाखाली 'समता पार्टी' होती. नितीश यांनी दलितांमध्ये 'महादलित' असा वर्ग बनवला आणि पुढे ईबीसी, म्हणजेच आर्थिक मागासवर्गीयांकडे लक्ष पुरवले. ते स्वतः कुर्मी जातीचे असून, आपल्या जातीची व्होटबँक नाही, याचे त्यांना आकलन आहे. म्हणूनच त्यांनी जेडीयूचा सामाजिक आधार वाढवण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला. मात्र विकासाच्या बाबतीत आजही बिहार अन्य राज्यांच्या तुलनेत मागास असून, येथे औद्योगिक विकास अजिबात झालेला नाही. इतर राज्यांत होणारे स्थलांतर रोखणे, हे आव्हान नव्या सरकारसमोर आहे. विरोधी पक्ष दुबळे असले म्हणून सत्ता कशीही राबवून चालणारे नाही. सध्या तरी नितीश कुमार यांचे पुनरागमन बिहारला एका नव्या दिशेला घेऊन जाईल, अशी अपेक्षा आहे.

# एक प्रवास माती पासून ते सोन्या पर्यंतचा नरेंद्र गावंडे

## पेपर वाटणाऱ्या मुलापासून सत्कारापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास

कष्ट, प्रामाणिकता आणि स्वतःवरचा विश्वास-या तीन गोष्टी जर आयुष्यात कायम ठेवल्या, तर साधा माणूसही असाधारण बनू शकतो. नरेंद्र गावंडे यांचा संघर्षमय पण तेजस्वी प्रवास हे याचे जिवंत उदाहरण आहे.

सुरुवात पेपर वाटण्यापासूनलहानपणी घरच्या परिस्थितीने तडजोड शिकवली, पण मेहनतीची आणि जबाबदारीची शिकवणही दिली. पहाटे उठून वृत्तपत्रे वाटणे, उन्हापावसात सायकलवरून घराघरांत पोहोचणे-या छोट्या पण महत्त्वाच्या कामातून नरेंद्र यांनी कामाची शिस्त, वेळेची किंमत आणि प्रामाणिकतेची जाण आत्मसात केली.तेव्हाच या मुलामध्ये भविष्याचा पाया तयार झाला होता.

कुबडे ज्वेलर्स : विश्वास जिंकण्याची पहिली पायरीनोकरीच्या शोधात नरेंद्र यांनी ज्वेलरी क्षेत्राची वाट धरली आणि कुबडे ज्वेलर्स येथे काम सुरू केले. ज्वेलरी क्षेत्रात प्रामाणिकता हीच खरी ओळख, आणि नरेंद्र यांनी हे तत्त्व अतिशय निष्ठेने पाळले.त्यांची नम्रतापूर्ण ग्राहक सेवा, व्यवहारातली पारदर्शकता आणि कामातील शिस्त यामुळे त्यांच्यावर सर्वांचे विश्वास बसला.

खंडेलवाल ज्वेलर्स : प्रामाणिकतेची उजळणीयानंतर त्यांना खंडेलवाल ज्वेलर्स मध्ये कामाची संधी मिळाली. येथे सोन्या-चांदीच्या व्यवहारात जबाबदारी अधिक, पण नरेंद्र यांची निष्ठा त्याहूनही अधिक.कितीही व्यस्त दिवस असो वा कितीही कठीण प्रसंग-नरेंद्र यांनी सत्य, नियम आणि पारदर्शकता या मूल्यांवर कधीही तडजोड केली नाही.त्यांच्या कामामुळे ग्राहकांचा विश्वास वाढला आणि संस्थेच्या प्रतिष्ठेतही भर पडली.

एकता आभूषण, अमरावती - वर्तमानाची नवी जबाबदारीआज नरेंद्र गावंडे एकता आभूषण, अमरावती येथे कार्यरत आहेत. अनेक वर्षांचा



अनुभव, ग्राहकांशी जपलेले नातं, नम्रता आणि प्रामाणिकता-या सर्व गुणांमुळे ते दुकानातील विश्वासू आणि महत्त्वाचे कर्मचारी बनले आहेत.त्यांच्या उपस्थितीने टीममध्ये कामाची सकारात्मक संस्कृती वाढली आहे.

सत्कार - मेहनतीला मिळालेला योग्य सन्मानत्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, निष्ठा आणि आदर्श कामपद्धतीची दखल घेऊन त्यांचे गुरुवर्य श्री राजेश जी अटलाणी आणि एकता आभूषण परिवाराने नरेंद्र गावंडे यांचा 'सत्कार' केला.हा सत्कार म्हणजे केवळ एक सन्मान नाही, तर त्यांचा संपूर्ण प्रवास-पेपर वाटण्याच्या साध्या सुरुवातीपासून आजच्या प्रतिष्ठित स्थानापर्यंतचा-याची योग्य ओळख आहे.

नरेंद्र गावंडे - अनेकांसाठी प्रेरणात्यांची कथा सांगते : सुरुवात कितीही छोटी असली तरी मनापासून केलेले काम कधी वाया जात नाही. प्रामाणिकपणा हीच सर्वात मोठी संपत्ती आहे. कष्ट आणि निष्ठा माणसाला कुठूनही कुठेही घेऊन जातात.

**निखिल काळमेघ**
ग्रा.पं. सदस्यसावंगा आसरा व्यवस्थापक
एकता आभूषण यवतमाळ




## हिवाळ्यात रात्री त्वचेला लावा ६ गोष्टी, सकाळी चेहऱ्यावर येईल तेज, कोरडी-निस्तेज त्वचा दिसेल सुंदर

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

१. हिवाळ्यात व्हीप्ड किंवा जेल क्रीम त्वचेला ओलावा देत नाहीत. त्याऐवजी आपण शिया बटर, कोको बटर, बदाम तेल किंवा ऑलिव्ह ऑइलसारखे घटक वापरु शकतो. त्यासाठी चांगले मॉइश्चरायझर निवडा. हे त्वचेवर चांगल्या प्रकारचा थर निर्माण करुन ओलावा टिकवून ठेवते.



२. जर आपली त्वचा खूप कोरडी असेल तर झोपण्यापूर्वी हायल्यूरॉनिक ॲसिड सीरम लावा. ज्यामुळे त्वचेतील पाणी टिकून राहते. यामुळे त्वचा मऊ आणि चमकदार बनते.

३. व्हिटॅमिन ई हे नैसर्गिक अँटीऑक्सिडेंट आहे जे त्वचेला रात्रीच्या वेळी दुरुस्त करण्यास मदत करतात. आपल्या क्रीममध्ये व्हिटॅमिन ई चे काही थेंब मिसळा. यानंतर त्वचेवर हलक्या हाताने मसाज करा. थंडीमुळे चेहऱ्याचा कोरडेपणा आणि सुरकुत्या कमी होतील.

४. कोरडी त्वचा असलेल्यांसाठी गुलाबाचे तेल, बदाम तेल, ऑर्गन ऑइल किंवा जोजोबा तेल चांगले असते. याचे काही थेंब रात्री चेहऱ्यावर लावा. ते त्वचेला पोषणा देतात, मॉइश्चरायझ करतात आणि चमक देतात.

५. हिवाळ्यात सर्वात जास्त ओठ फाटतात, कोरडे पडतात. पण रात्री झोपण्यापूर्वी लिप बाम लावा. डोळ्यांखाली काळी वर्तुळे किंवा सूज येत असेल तर क्रीम लावा. डोळ्यांखालील त्वचा नाजूक असते. त्यासाठी मॉइश्चरायझर लावायला हवं

६. जर आपला चेहरा लाल होत असेल, सतत जळजळत असेल किंवा संवेदनशील असेल तर रात्री झोपण्यापूर्वी कोरफडीचा गर लावा. हे थंड, मॉइश्चरायझिंग असते. हिवाळ्यात रात्री त्वचेची निगा राखल्यास सकाळी त्वचा चमकण्यास मदत होईल. तसेच चेहरा धुतल्यानंतर कोणतेही क्रीम किंवा सीरम लावा.

# प्रति हेक्टर ३२ क्विंटलपर्यंत उत्पादन देणाऱ्या 'या' आहेत हरभऱ्याच्या टॉप ३ व्हरायटी

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक**

भारतातील सर्वात लोकप्रिय पिकांपैकी हरभरा हे एक पीक आहे. कारण हरभऱ्याची मागणी वर्षभर असते. सध्या रब्बीचा हंगाम सुरु असून या हरभरा पेरणीला सुरवात झाली आहे. अशा स्थितीत अधिक उत्पादनाच्या आयसीएआर विकसित तीन टॉपच्या व्हरायटींची माहिती देत आहोत, सविस्तर जाणून घेऊयात

आयसीएआरने विकसित केलेल्या सुधारित हरभरा जाती - बीजी ३०२२ काबुली, बीजी ३०४३ देसी आणि पुसा चणा २०२११ देसी (पुसा मानव) यांचा समावेश आहे. या जातींची लागवड केल्यास कमी खर्चात जास्त उत्पादन देऊ शकतात आणि चांगले बाजारभाव मिळवून चांगला नफा मिळवता येईल.उच्च उत्पादन देणाऱ्या

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

हरभराच्या ३ जाती

**१. बीजी ३०२२ काबुली** : ही हरभराची एक उत्कृष्ट जात आहे, विशेषतः बागायती क्षेत्रांसाठी योग्य. दाणे सामान्यतः मोठे, पांढरे आणि आकर्षक असतात. ज्यामुळे बाजारात मागणी जास्त असते आणि किंमतही जास्त असते. म्हणूनच, ही जात शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त उत्पन्न मिळवण्यास सक्षम आहे.

**महत्त्वाची वैशिष्ट्ये**

उत्पादन कालावधी : अंदाजे १४५ दिवस

**उत्पादन क्षमता** : प्रति हेक्टर १८ ते ३० क्विंटल

लागवड क्षेत्र : उत्तर भारत, मध्य भारत आणि राजस्थानमधील अर्ध-शुष्क प्रदेश

मोठ्या आणि पांढऱ्या दाण्यांमुळे बाजारपेठेत जास्त मागणी आणि चांगले भाव मिळतात.

**२. बीजी ३०४३ देशी**

बीजी ३०४३ देशी ही कमी खर्चाच्या लागवडीसाठी विशेषतः विकसित केलेली उच्च दर्जाची हरभरा जात आहे. त्याला कमी खत, कमी सिंचन आणि कमी मजुरीची आवश्यकता असते, ज्यामुळे ती लहान आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत फायदेशीर पर्याय आहे.

**महत्त्वाची वैशिष्ट्ये**

उत्पादन कालावधी : अंदाजे १३० दिवस (जलद पक्व होणारी जात)




उत्पादन क्षमता : प्रति हेक्टर १६-२५ क्विंटल

रोग प्रतिकार : मुळ कुजणे, मरगळ आणि पानांवर डाग पडण्यापासून संरक्षण करते

मर्यादित संसाधनांमध्येही चांगले उत्पादन देणारा वाण

३. पुसा चणा २०२११ देशी (पुसा मानव)

आयसीएआरने विकसित केलेल्या नवीन पिढीतील सुधारित देसी हरभरा जातींपैकी ही एक आहे. वाढते तापमान आणि अनियमित पाऊस यासारख्या बदलत्या हवामान परिणामांना लक्षात घेऊन ही विकसित करण्यात आली आहे, जेणेकरून शेतकरी सर्व परिस्थितीत चांगले उत्पादन मिळवू शकतील.

**प्रमुख वैशिष्ट्ये**

**उत्पादन कालावधी** : १०८ दिवस (सर्वात लवकर पिकणाऱ्या जातींपैकी एक)

उत्पादन क्षमता : प्रति हेक्टर २३ ते ३२ क्विंटल

योग्य क्षेत्र : गुजरात, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश

धोकादायक मर रोगाला उच्च प्रतिकारशक्ती

**शेतकऱ्यांसाठी फायदे**

या सर्व जाती रोगप्रतिकारक आहेत.

मर्यादित सिंचन असतानाही त्या उत्कृष्ट उत्पादन देतात.

शेतकरी चांगले बाजारभाव मिळवून जास्त नफा मिळवू शकतात.

लहान आणि सीमांत शेतकरी त्यांचे उत्पादन वाढवून सहजपणे आर्थिक बळकटी मिळवू शकतात.

# पाथरगाव उपसा सिंचन योजनेच्या पाणी वापर संस्थांना एकदिवसीय प्रशिक्षण२०२५ च्या रब्बीपासून पाणी मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ अमरावती,**

मोर्शी तालुक्यातील ऊर्ध्व वर्धा प्रकल्पांतर्गत पाथरगाव उपसा सिंचन योजनेचे बांधकाम पूर्ण झाले असून, सन २०२५ च्या रब्बी हंगामापासून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापन पाणी वापर संस्थांमार्फत (पा.वा.सं.) करावयाचे असल्याने, त्यांना सक्षम करण्यासाठी नुकतेच एकदिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

ऊर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अधीक्षक अभियंता मनीष राजभोज, सेवानिवृत्त प्राध्यापक बाळासाहेब शेटे, सेवानिवृत्त जलसंपदा विभाग कार्यकारी अभियंता किशोर वरंभे उपस्थित होते.

कार्यकारी अभियंता अनिकेत सावंत यांनी प्रास्ताविक केले. श्री. राजभोज यांनी 'महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन २००५' या कायद्यानुसार स्थापन झालेल्या ६ पाणी वापर संस्थांना पाण्याचा इष्टतम वापर, पीक पद्धती निवडणे, घनमापन पद्धतीने पाणी वापर करणे आणि पाणीपट्टी वसुलीच्या अधिकाराचा प्रभावी वापर करून गावाचा विकास करण्याचे आवाहन केले.

श्री. शेटे आणि श्री. वरंभे यांनी सिंचन कायदे, पा.वा.सं. चा उद्देश, कार्यप्रणाली आणि गट शेती या विषयांवर मार्गदर्शन केले. संत




सेवालाल महाराज (जळका), संत पांडुरंग महा. (जळका), एकनाथ महा. (आमला), विश्वेश्वर पा.क.रते. (आमला), परिवर्तन (टेंभुर्णी), आणि समृद्धी (टेंभूर्णी) या सहा संस्थांचे अध्यक्ष, सदस्य प्रशिक्षणात सहभागी झाले होते. त्यांना हस्तांतरण प्रमाणपत्र व उपस्थिती प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय खेळाडूचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती,** ढाका (बांगलादेश) येथे झालेल्या एशियन आर्चरी चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत जिल्ह्यातील खेळाडू यशदीप भोगे याने वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले. यानिमित्ताने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात त्याचा सत्कार केला. यावेळी आमदार सुलभा खोडके, कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी, विनोद पिदुरकर, उपअभियंता एन. प्रकाश रेड्डी, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, मनपा शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, पोलिस निरीक्षक आनंद पिदूरकर, गटशिक्षणाधिकारी श्री. मोहने, आदी उपस्थित होते.यशदीप भोगे याने आर्चरी चॅम्पियनशिपमध्ये क्वालिफिकेशन राऊंडमध्ये जागतिक क्रमवारीत नंबर एकचा कोरियाच्या खेळाडूसोबत क्वॉलिफिकेशन राऊंड खेळून वैयक्तिक प्रकारात ७२० पैकी ६८७ गुण प्राप्त करून वर्ल्ड आर्चरी चॅम्पियनशिपकरिता निवड झाली आहे. जिल्हाधिकारी श्री. येरेकर आणि आमदार श्रीमती खोडके यांनी आंतरराष्ट्रीय खेळाडूंकरीता अद्ययावत क्रीडा सुविधा, क्रीडा साहित्य त्यांच्या



मागणीनुसार उपलब्ध करून द्याव्यात. तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली युवा खेळाडू तयार करण्यावर भर द्यावा. इतरांना प्रेरणा मिळावी, यासाठी या खेळाडूंचा सार्वजनिक कार्यक्रमात सत्कार करण्यात यावा, अशी सूचना केली.

यावेळी क्रीडा संकुलात उभारण्यात येणाऱ्या वसतिगृहाचा आढावा घेण्यात आला. बांधकामासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी प्रयत्न करण्यात यावे. यामुळे ४० मुला-मुलींच्या राहण्याची सोय होणार आहे. इमारतीचे काम अंतिम टप्प्यात असून यानंतर स्केटींगच्या मैदानासाठी निधी मागणी करावी. संपूर्ण क्रीडा संकुलामधील विजेसाठी सोलार यंत्रणा बसविण्यात यावी. तालुका क्रीडा संकुलाचा प्रश्न असून चांगले व्यवस्थापन व्हावे, यासाठी उपाययोजना करण्यात यावी. क्रीडा संकुलातील नव्या समितीमध्ये खेळाडूंचा समावेश करावा. यात प्रामुख्याने धर्नुविद्या खेळातील खेळाडूचा समावेश झाल्यास त्याच्या ज्ञानाचा लाभ होण्यास मदत होणार आहे. तसेच शालेय आणि शासकीय क्रीडा स्पर्धा क्रीडा संकुलात होण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचनाही श्री. येरेकर यांनी दिल्या.-

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २२ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# मोर्शी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे ६ तास ठिय्या आंदोलन !

## फळ पिक विम्यासाठी संत्रा उत्पादक शेतकरी आक्रमक !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मोर्शी–**

जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना २०२४–२५ विमा परतावा शेतकऱ्यांच्या खात्यात व्याजासह जमा करणेबाबत बाबत मोर्शी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष वाळके यांच्या नेतृत्वात मोर्शी तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयात ६ तास ठिय्या आंदोलन करण्यात आले.प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारीत फळपिक विमा योजने अंतर्गत सन २०२४ – २०२५ या वर्षामध्ये आंबिया बहारामध्ये मोर्शी वरूड तालुक्यासह संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी कोट्यावधी रुपयांचा विमा हप्ता भरून फळ पिक विमा योजनेत मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला असतांना रब्बी हंगाम संपल्यावर ४५ दिवसांत परतावा जाहीर करणे क्रमप्राप्त असतांना हंगाम संपून सहा महिने लोटले तरी ट्रिगर व परतावा जाहीर करण्यात न आल्याने संत्रा बागायतदारांना फळ पिक विमा परताव्याची प्रतीक्षा आहे.



हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार कृषी विभागाने लागलेले ट्रिगर विमा कंपनीला पाठविलेले असून जिल्ह्यातील ६७ महसूल मंडळांपैकी फळ पिक विमा काढलेल्या ४७ महसूल मंडळांमध्ये ९५ ट्रिगर लागलेले असतांना सुद्धा शासन व विमा कंपनीच्या दुर्लक्षितपणामुळे जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकरी विमा मदतीपासून वंचित असल्याचा आरोप रुपेश वाळके यांनी केला.

युनिव्हर्सल सोम्पो इन्शुरन्स विमा कंपनीकडून मोर्शी वरूड तालुक्यासह अमरावती जिल्ह्यातील हजारो पात्र विमाधारक शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे फळ पिक विम्याचे कोट्यावधी रुपये वाटप करण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे नवीन २०२५– २०२६ चा हवामानावर आधारित फळ पिक विमा काढण्यासाठी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना पुन्हा कर्जबाजारी व्हावे लागणार आहे तर काही शेतकरी आंबिया बहार विम्यावर बहिष्कार टाकणार असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पिक विमा योजनेपासून वंचित राहावे लागणार आहे.

शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या शेतकऱ्यांना विमा मदतीपासून वंचित ठेवणाऱ्या युनिव्हर्सल सोम्पो इन्शुरन्स विमा कंपनीवर कार्यवाही करून तत्काळ फळ पिक विम्याचे पैसे मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न झाल्यास बुधवार दिनांक २६ नोव्हेंबर पासून जिल्ह्यातील सर्व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांच्या तर्फे देण्यात आला यावेळी विनोद ठोके, हितेश साबळे, अनिकेत राऊत, कांचन कुकडे, प्रकाश डागवार, दिलीप पेठे, संजय साबळे, पवन कटोलकर, श्रीराम भामकर, प्रवीण आखरे, सतीश घोरमाडे, राजेश पेठे, नामदेव चढोकर, सागर ठाकरे, सुभाष चौधरी, अरुण राऊत, नरेश चौधरी, रवींद्र गाजरे, दिनेश गांजरे, गणेश घोरमाडे, दिनेश गांजरे यांच्यासह संत्र उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रहाटगाव येथील राख विक्री घोटाळा कंत्राटदारांनी लाटलालाखोंचा मलिदा

## सहा दिवसानंतरही तक्रार नाही

### प्राधिकरणासह प्रशासनावर संगनमताचे आरोप

मंगेश तायडे
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नांदगाव पेठ**

रहाटगाव येथील उड्डाण पुलाच्या बांधकामासाठी नागपूर जिल्ह्यातील मौदा येथील ऊर्जा प्रकल्पातून येणारी राख कंत्राटदारांकडून सर्रासपणे विक्री केल्या जात होती.दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या या अवैध राख विक्रीतून कंत्राटदाराने लाखो रुपयांचा मलिदा लाटला.रविवारी उघडकीस आलेल्या या घटनेला तब्बल सहा दिवस उलटले तरीही राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण किंवा संबधीत यंत्रणेने या गंभीर घटनेची पोलीस तक्रार तर सोडाच मात्र दखल सुद्धा घेतलेली नाही त्यामुळे प्राधिकरणासह प्रशासनावर संगनमत असल्याचे आरोप होत आहे. दोन महिन्यांपासून राजरोसपणे सुरू असलेल्या या प्रकाराला स्थानिक वाहनमालकांनी उघडकीस आणल्यानंतर जिल्ह्यात खळबळ उडाली होती. याप्रकरणी नांदगाव पेठ पोलीस देखील घटनास्थळी दाखल झाले होते. भाजपा ट्रान्सपोर्ट सेल चे जिल्हा संयोजक राजू चिरडे यांनी पोलीस स्टेशन ला लेखी तक्रार देखील सादर केली होती मात्र पोलिसांनी अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल केलेला नाही.सुरुवातीला प्रति ट्रक १ हजार, नंतर २ हजार आणि सध्या थेट ४ ते ५ हजार रुपये अश्या वाढत्या दराने ही अवैध विक्री सुरू होती. दररोज २५ ते ३० ट्रक राख रहाटगाव प्रकल्पावरून थेट बाजारात विकली जात होती. जवळपास दोन महिने हा प्रकार निर्भयपणे सुरू राहिला असून, सरकारी संसाधनाची अशी उघड लूट होत असतानाही संबंधित विभाग, वाहतूक अधिकारी, राजमार्ग प्राधिकरण आणि स्थानिक यंत्रणा पूर्णतः मौन आहेत. वाहनमालकांनी या व्यवहाराचा भंडाफोड केल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. परंतु प्रकरण उघडकीस येऊन सहा दिवस उलटले तरीही ना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून तक्रार नोंदवली गेली, ना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. उलट, हे प्रकरण दाबण्यासाठी संगनमताने प्रयत्न सुरू असल्याच्या चर्चा सुरू आहेत.सरकारी मालमत्तेची अशी थेट व अवैध विक्री, कंत्राटदारांचा अनधिकृत नफा, आणि त्यावर प्रशासनाची शांतता हे सर्व मिळून या घोटाळ्याचे स्वरूप अत्यंत गंभीर असल्याचे स्पष्ट होते. प्राधिकरणाकडून कारवाई न होणे, कंत्राटदारांवरील सौम्य भूमिका, आणि सहा दिवसांपासून सुरू असलेली संशयास्पद शांतता यामुळे पाणी कुठेतरी मुरतेय का? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.रहाटगाव परिसरात या प्रकरणामुळे मोठी खळबळ माजली असून, शासन संसाधनांची लूट उघडकीस आल्यानंतरही अद्याप कारवाई न झाल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.



### कंत्राटदाराला काळ्या यादीत टाका

संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीने ही राख स्थानिक व्यावसायिकांना रोखीने विकून मोठा आर्थिक डल्ला मारल्याचा आरोप होत आहे.शासनाला लाखो रुपयांचा चुना लावल्याप्रकरणी रहाटगाव उड्डाणपुलाचे बांधकाम करणाऱ्या दोन्ही कंपन्यांना राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणने काळ्या यादीत टाकावे अशी मागणी नांदगाव पेठ ग्रा पं. चे सदस्य बलविर चव्हाण यांनी केली आहे.

# पर्यावरणपूरक मूर्ती–फोटो संकलन उपक्रमाची भव्य सांगता

## राज्यासाठी आदर्श मॉडेल ठरण्याच्या दिशेने अमरावती मनपा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

पर्यावरण संवर्धन, धार्मिक साहित्याची सन्मानपूर्वक विल्हेवाट आणि शहरातील जलस्रोतांचे संरक्षण यांचा उत्कृष्ट समन्वय साधत अमरावती महानगरपालिकेतर्फे राबविण्यात आलेल्या मूर्ती व धार्मिक फोटोंच्या संकलन आणि विसर्जन उपक्रमाची भव्य सांगता आज छत्री तलाव परिसरात उत्साहात पार पडली.महानगरपालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेला हा उपक्रम राज्यातील इतर महानगरपालिकांसाठी आदर्श ठरेल, असे प्रतिपादन त्यांनी प्रसंगी केले. त्यांनी सांगितले की, अमरावती शहरातील नागरिकांनी पर्यावरण आणि परंपरेचा समतोल साधत ज्या जाणिवेने सहभाग नोंदविला, तो अत्यंत कौतुकास्पद आहे. मनपा, सामाजिक संस्था आणि नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नातून शहरात पर्यावरणपूरक सणसंस्कृती दृढ होत आहे. पाचही मनपा झोनमधून संकलित झालेल्या एकूण ५४२ लक्ष्मीमूर्तींचे आज शास्त्रोक्त विधीनंतर पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन करण्यात आले. याशिवाय नागरिकांनी जमा केलेल्या मूर्ती व धार्मिक फोटोंनाही वैज्ञानिक पद्धतीने सन्मानपूर्वक विल्हेवाट लावण्यात आली. हा उपक्रम मागील तीन वर्षांपासून प्रभावीपणे राबविला जात असून, यामध्ये माजी महापौर श्री. प्रमोद पांडे आणि त्यांचा एम.एच.–२७ एटीएस ग्रुप अग्रभागी राहिला आहे. संकलनासाठी स्वतंत्र वाहन, रस्त्याकडेला वा नाल्यात पडलेल्या मूर्ती, फोटोंचे संकलन आणि जनजागृती यांत त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.मनपा सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे यांनी सांगितले की, धार्मिक साहित्याचा सन्मान राखून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पांडे यांचे सातत्यपूर्ण कार्य प्रशंसनीय आहे. या उपक्रमात विविध छत्र्ज, सामाजिक संस्था, स्वयंसेवक, विद्यार्थी आणि र्धेंपिस चर्रीशश्र ढशरा ने सक्रिय सहभाग नोंदवून संकलन, वर्गीकरण, मार्गदर्शन व जनजागृतीची महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली.मनपाच्या पाचही झोनमधील जेष्ठ स्वास्थ निरीक्षक, स्वास्थ निरीक्षक व सफाई कर्मचारी यांनी घराघरांतून मिळालेल्या मूर्तींचे संकलन, नोंद, वाहतूक आणि व्यवस्थापन काटेकोरपणे पूर्ण केले.आजच्या सांगता कार्यक्रमास जिजाऊ बँकेचे उपमुख्य अधिकारी हरिश नसीरकर, मराठी विज्ञान परिषद अध्यक्ष प्रा. प्रवीण गुल्हाने, प्रा. समीर चौधरी, अंजली प्रमोद पांडे, छाया किशोर कडू, संध्या अवसरे, मोनाली आगाशे, आशादिप फाऊंडेशनच्या आशाताई दरणे व आनंद दरणे, शंतनु पाटील, मनिष जाधव, शुभम गाढवे, मनपाचे विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच या वेळी मनपा सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, नितीन बोबडे, वैद्यकीय अधिकारी ( स्वच्छता ) डॉ. अजय जाधव, स्वच्छ भारत अभियान अमरावती शहर समन्वयक श्वेता बोके, र्धेंपिस चर्रीशश्र त्र्ीी चे सदस्य, तसेच सर्व झोनमधील जेष्ठ स्वास्थ निरीक्षक, स्वास्थ निरीक्षक आणि सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मनपा प्रशासनाने हा उपक्रम वर्षभर सातत्याने राबविण्याचा मानस व्यक्त केला असून शहरात कायमस्वरूपी संकलन केंद्रे स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे. पर्यावरण संवर्धन, प्रदूषण नियंत्रण, धार्मिक साहित्याची सन्मानपूर्वक विल्हेवाट आणि जनजागृती यासाठी मनपा, सामाजिक संस्था व नागरिकांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणात उपक्रम राबविण्यात येतील.अमरावती मनपाचा हा उपक्रम धार्मिक परंपरेचा सन्मान राखत पर्यावरण संरक्षणाची जबाबदारीही पूर्ण करणारा असल्याने राज्यातील इतर शहरांसाठी आदर्श ठरत आहे.–



# तिवसा एसटी बसस्थानकाची स्वच्छ सर्वेक्षणात चमकदार कामगिरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२तिवसा** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ अभियानांतर्गत राज्यातील बस स्थानकांचे नवनिर्माण व सौंदर्यीकरणाचा संकल्प केला असून, या उपक्रमाचा प्रभावी प्रत्यय तिवसा एसटी बस स्थानकात पाहायला मिळाला. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी गडचिरोली येथील स्वच्छ सर्वेक्षण मूल्यांकन समितीने तिवसा बस स्थानकाची प्रत्यक्ष पाहणी करून विविध निकषांवर थेट मूल्यमापन केले. रंगसंगती, आकर्षक भित्तीचित्रे व हिरवाईने बदलले स्थानकाचे रूप सौंदर्यीकरणाच्या



कामामुळे तिवसा बसस्थानकाचे स्वरूपच पालटले आहे. भिंतींवरील समाजप्रबोधनपर भित्तीचित्रे, आकर्षक रंगसंगती, स्वच्छ परिसर, कुंड्या आणि हिरवळ यामुळे बस स्थानक प्रवाशांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. या स्थानकाचे कौतुक या पाहणीदरम्यान विभाग नियंत्रक अशोक कुमार, विभागीय अभियंता कुणाल सार, विभागीय वाहतूक अधिकारी योगेश ठाकरे, बस स्थानक प्रमुख प्रतीक मोहोड, रामभाऊ गुल्हाने, प्रवासी मित्र व सेवानिवृत्त मुख्याध्यापक शालिग्राम कांडलकर, पत्रकार सुनील घोरमाडे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी स्थानकातील सुधारणा, सुविधा आणि सौंदर्यीकरणाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. साठीमहामंडळ व सरकारचा पुढाकार कौतुकास्पद तिवसा बस स्थानकाच्या उभारणी, स्वच्छता आणि सुविधांच्या सक्षमीकरणा साठी महामंडळ आणि राज्य सरकारने घेतलेला पुढाकार हा ग्रामीण भागातील विकासाचा उत्तम नमुना असल्याचे मूल्यांकन समितीने स्पष्ट केले. या सर्व स्थानिकांचे योगदान उल्लेखनीय या संपूर्ण अभियानात अमरावती विभाग नियंत्रक निलेश बेलसरे व चांदुर रेल्वे आगार व्यवस्थापक जयंत झाडे यांचे मार्गदर्शन लाभले. बस स्थानक प्रमुख प्रतीक मोहोड आणि रामभाऊ गुल्हाने यांच्या नेतृत्वाखाली कर्मचारी सुधा वानखडे, मनोज मोरे, रतन खाकसे यांचेही विशेष योगदान राहिले.

# अतिरिक्त ज्वारी साठ्याचा लाभ

## गहू–तांदळासोबत आता रेशन दुकानांवर मिळतेय मोफत ज्वारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** नोव्हेंबर २०२५ पासून रेशन दुकानांमध्ये गहू आणि तांदळासोबत ज्वारीचे मोफत वाटप सुरू झाले असून, दोन महिन्यांपर्यंत ही योजना राबवली जाणार आहे.

या योजनेचा लाभ अंत्योदय अन्न सुरक्षा योजना आणि प्राधान्य कुटुंब गटातील रेशनकार्डधारकांना मिळणार आहे. राज्यातील मोठ्या संख्येने कुटुंबे या योजनेंतर्गत येत असल्याने मोफत ज्वारी वितरणाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. केंद्र सरकारने खरेदी केलेल्या अतिरिक्त ज्वारीचा साठा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

नियमित गहू–तांदूळ वाटपाबरोबरच प्रत्येक कुटुंबातील प्रतिसदस्य दरमहा एक किलो ज्वारी मोफत दिली जात आहे. ज्वारी हा पौष्टिक आणि पोटभरीचा अन्नघटक असल्याने ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना याचा प्रत्यक्ष फायदा होत आहे.

विशेषतः भूमिहीन, मजूरवर्ग, शेतमजूर, रोजंदारी कामगार आणि अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांना या वाटपामुळे दिलासा





मिळाल्याचे दिसून येत आहे.गेल्या काही महिन्यांपासून वाढती महागाई, दैनंदिन वापरातील धान्यांचे भाव वाढणे आणि रोजंदारीवर जगणाऱ्यांवरील आर्थिक ताण लक्षात घेता, अतिरिक्त एक किलो ज्वारी मिळणे, ही छोटी पण महत्त्वाची मदत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून मिळत आहे.

यामुळे रेशन दुकानांमध्येही नेहमीपेक्षा जास्त गर्दी दिसून येत आहे. लाभार्थ्यांना कोणताही अतिरिक्त अर्ज किंवा प्रक्रिया न करता नियमित रेशनसोबतच ज्वारी मिळत असल्याने समाधानाचे वातावरण आहे.

काही ठिकाणी ज्वारीच्या साठ्यात तुटवडा जाणवू नये म्हणून आगाऊ उपलब्धता सुनिश्चित करण्यावर भर दिला जात आहे. दोन महिन्यांचा हा उपक्रम यशस्वी झाल्यास पुढील काळात अशा पूरक धान्यवाटपासंदर्भात निर्णय घेण्याची शक्यता असल्याचे संकेत मिळत आहेत.

# श्री गुरु तेग बहादूर जी ३५० वा शहीद दिवस

## नगर कीर्तन आणि सत्संगाचे आयोजनगुरुद्वारा श्री गुरुसिंघ सभा द्वारे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ अमरावती** सत्य आणि धर्माची महती पटवून देणारा अमरावती येथील आयोजित गुरु तेग बहादूरजी यांचा ३५० वा शहीद दिवस कार्यक्रमाचे निमित्याने श्री गुरुसिंघ सभा, अमरावती च्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २३ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आयोजित या विशेष अध्यात्मिक कार्यकामाचे आयोजनाला घेऊन शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत श्री गुरुसिंघ सभा, अमरावती कार्यकारिणीचे सचिव –डॉ. निक्कू खालसा यांनी विस्तृतपणे माहिती दिलीय. धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवाधिकारांचे संरक्षण, करुणा, त्याग आणि साहसाचे प्रतीक नववे पातशाह श्री गुरु तेग बहादूर जी आजही संपूर्ण मानवतेसाठी दीपस्तंभ आहेत. चला, आपल्या परिवारासह या पवित्र भूमीवर श्रद्धेने नतमस्तक होऊन या दिव्य आयोजनाचा भाग बनूया. असा अभिनव संदेश देत श्री गुरु साहिब यांच्या द्वारे देण्यात आलेली शिकवण, त्यांचा त्याग आणि सार्वभौमिक संदेश हा प्रत्येक जनमाणसा पर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी राजकमल चौक येथे सायंकाळी ४ ते ६ दरम्यान महला नववा पठन आणि सिमरन संपन्न होणार आहे. खुल्या वातावरणात होणारा हा कार्यक्रम गुरु साहिब यांचे जीवन कार्य सरळ सोप्या शब्दांत जवळून अनुभव करण्याचे एक माध्यम बनेल. यासोबतच २५ नोव्हेंबर रोजी बुटी प्लॉट, अमरावती येथील श्री गुरुसिंघ सभा येथे शहिदी गुरु पर्वावर सकाळी ८ वाजता श्री सुखमणी पाठ तसेच अखंड पाठ साहेब आयोजन करण्यात आले आहे. ननकाना साहिब येथील प्रसिद्ध रागी भाई अजय सिंघ जी यांच्या अमृततुल्य वाणीतून गुरुबाणी कीर्तन श्रवणाचा लाभ भावीक भक्तांना होणार आहे. यादरम्यान कथा, विचार आणि शहिदी स्मरणाचे महती आदि बाबींवर प्रकाशझोत टाकण्यात येणार आहे. श्री गुरुद्वारा गुरुसिंघ सभा, अमरावती च्या वतीने आयोजित या भव्यदिव्य आयोजन निमित्त सिख, पंजाबी, सिंधी, सिखलीगर समाजाच्या सर्व परिवार सदस्यांनी सहभागी व्हावे. आपली सर्वांची उपस्थिती



ही केवळ श्रद्धांजली नसून – तर हे कार्य म्हणजे गुरु तेग बहादूर साहिब यांचा जो सर्वोच्च संदेश आहे, तो म्हणजे धर्माचे स्वातंत्र्य, मानवता आणि सत्य ला पुढे नेण्याचा संदेश आहे. या पत्रकार परिषदेत गुरुद्वारा श्री. गुरुसिंघ सभा, अमरावती अध्यक्ष अमरज्योत सिंघ जग्गी, सचिव – डॉ. निक्कू खालसा कार्यकारी अध्यक्ष –रवींद्र सिंघ उर्फ बिट्टूसेठ सलूजा, कोषाध्यक्ष – रतनदीप सिंघ बग्गा, महासचिव – राजेंद्र सिंघ उर्फ कालुसेठ सलूजा, दिलीप सिंघ बग्गा, माजी महापौर – चरणजित कौर उर्फ रीना नंदा आदिसहित सर्व कार्यकारिणी सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते. या पत्रकार परिषदेत या आयोजनाला घेऊन सचिव – डॉ. निक्कू खालसा यांनी प्रसार माध्यम प्रतिनिधिशी संवाद साधताना सांगितले.

### १० नगर परिषद, २ नगर पंचायत निवडणूक रणधुमाळी

# २१० उमेदवारांची माघार, नगराध्यक्ष ७७, सदस्यासाठी १३२९ मैदानात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती**

जिल्ह्यातील अचलपूर, अंजनगाव सुर्जी वरुड दर्यापूर, चांदूरबाजार, चिखलदरा, धामणगाव रेल्वे, मोर्शी, चांदूर रेल्वे आणिशेंदूरजनाघाटया दहा नगर परिषद आणि धारणी आणि नांदगाव खंडेश्वर या दोन नगर पंचायतीमध्ये आता खऱ्या अर्थाने निवडणूक रणधुमाळी सुरु झाली आहे. नामांकन मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत अध्यक्षपदाच्या ३० तर सदस्यपदाच्या १८० अशा २१० उमेदवारांनी निवडणुकीचे मैदान सोडले. त्यामुळे आता १२ अध्यक्षपदासाठी ७७तर २५८ सदस्यपदाकरिता १३२९ उमेदवार निवडणूक मैदानात लढण्यासाठी कायम आहेत. विशेष म्हणजे शुक्रवारी नामांकन अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सर्वाधिक १६९ उमेदवारांनी माघार घेतली आहे.नगरपरिषद व नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता १० ते १७ नोव्हेंबर दरम्यानउमेदवारांचे नामांकन अर्ज स्वीकारण्यात आले. या अर्जाची १८ नोव्हेंबर रोजी छाननी प्रक्रिया पार पडली. तर १९ ते २१ नोव्हेंबर दरम्यान उमेदवारांना नामांकन अर्ज मागे घेण्याची संधी देण्यात आली होती. या दरम्यान निवडणुकविभागाकडे सदस्य पदाकरिता १०८ तर सदस्यांकरिता १५१६ नामांकन प्राप्त झाले होते. या तीन दिवसांत अध्यक्ष पदाच्या ३० तर सदस्य पदाच्या १८० उमेदवारांनी नामांकन अर्ज मागे घेतले आहे. शुक्रवारीशेवटच्या दिवशी अध्यक्ष पदाकरिता २२ तर सदस्यांकरिता १४७ उमेदवारांनी निवडणुकीतून



माघार घेतली आहे. त्यामुळे सद्या अध्यक्षपदाकरिता ७७ व सदस्यांकरिता १३२९ नामांकन शिल्लक आहेत.

### चार नगरपरिषदेत आठ उमेदवारांचे अपील

ज्या उमेदवारांचे नामांकन अवैध ठरविण्यात आले अशा आठ उमेदवांनी अपील दाखल केली आहे. यामध्ये अचलपूर नगराध्यक्ष पदाचे उमेदवारासह अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, धारणी आणि अचलपूर येथून सदस्य पदाच्या उमेदवारांचा समावेश आहे. या अपीलावर २५ नोव्हेंबरच्या आत सुनावणी घेऊन ते विशेष न्यायालयातून निकाली काढले जाणार आहे.

### अवैध नामांकन उमेदवाराला २५ पर्यंत अपीलाची संधी

दरम्यान ज्या उमेदवारांचे नामांकन अवैध ठरविण्यात आले होते. त्यांना अपीलाची संधी देण्यात आली आहे. ही प्रक्रिया २५ नोव्हेंबरपर्यंत चालणार असून त्यानंतर २६ नोव्हेंबरला निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करून त्यांना त्याच दिवशी चिन्हांचे वाटप होणार आहे. त्यानंतर प्रचारा सुरूवात होईल. त्यामुळे प्रचाराच्या चार ते पाच दिवसांत उमेदवांची खरी कसरत होणार आहे. त्यामुळेनिवडणुकीची देखील रंगत वाढणार आहे.

### थंडी वाढली तरी राजकारण तापले!

# धामणगावमध्ये भाजप-काँग्रेस आमनेसामने

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२ धा.रेल्वे**

१९धामणगाव शहरातील नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तापमान गार असले तरी राजकीय पारा चांगलाच वाढू लागला आहे. भाजप आणि काँग्रेस या दोन मोठ्या पक्षांची थेट लढत असल्याने शहरात राजकीय 'ज्वर' चढला असून उमेदवारांकडून रात्री उशिरापर्यंत गुप्त बैठकांचा सिलसिला सुरू झाला आहे. या बैठकीत जुन्या नात्यांना नव्या ऊर्जेची 'चार्जिंग' मिळत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. धामणगाव शहर हे दोन प्रमुख भागांत-धामणगाव आणि दत्तापूर-विभाजित आहे. रेल्वेच्या अलीकडील उत्तर भागात सहा प्रभागांमधून १२ नगरसेवक निवडले जाणार आहेत. यात सहा जागा महिला आणि सहा पुरुष उमेदवारांसाठी राखीव आहेत. दक्षिण भागात चार प्रभाग असून अमर शहीद भगतसिंग चौक, नेहरू पार्क, मार्केट चौक आणि दत्तापूर परिसरातून एकूण आठ नगरसेवक-चार महिला व चार पुरुष-निवडले जातील. अशा प्रकारे एकूण २० जागांसाठी ही निवडणूक होत असून प्रत्येक जागेवर भाजप-काँग्रेसने तुल्यबळ उमेदवार मैदानात उतरवले आहेत.ही निवडणूक दोन्ही पक्षांसाठी प्रतिष्ठेची ठरू लागली आहे. प्रभागनिहाय मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांनी घरभेटींचा धडाका सुरू केला आहे. प्रत्येक कुटुंबप्रमुखापर्यंत संपर्क साधण्यावर विशेष भर दिला जात आहे.निवडणुकीच्या रणधुमाळीत अनेक ठिकाणी जुन्या नातेसंबंधांना पुन्हा उजाळा मिळाल्याचे दिसून येत आहे. अनेक इच्छुक तसेच सक्रिय कार्यकर्ते विस्मृतीत गेलेल्या ओळखी पुन्हा जुळवून मतदारांसोबतचा संवाद वाढवत आहेत.दरम्यान, राजकीय हालचालींना वेग आल्याने धामणगावची ही निवडणूक रंगतदार व रोचक होणार असून नागरिकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.-



# अंबानगरी सुपरफास्ट एक्सप्रेसला आता पाच अतिरिक्त डबेगाडी झाली २२ डब्यांची

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती-** मुंबई-अमरावती एक्सप्रेस गाडी नंबर १२१११ ही कायमच प्रवाशांच्या गर्दीने भरलेली असते. प्रचंड गर्दीमुळे प्रवाशांचे हाल होत असल्याने या गाडीचे डबे वाढविण्याची मागणी अनेक दिवसांपासून करण्यात येत होती. त्यासाठी प्रवासी तसेच संस्था, संघटनांकडून प्रयत्न करण्यात येत होते. प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रासाठी मुंबई अमरावती सुपरफास्ट एक्सप्रेसचे महत्व अधिक आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्रातून या गाडीचे डबे वाढविण्यासाठी सतत पाठपुरावा करण्यात येत होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले आहे. अमरावती मुंबई (अंबानगरी) उत्तर महाराष्ट्रातील रेल्वे प्रवाशांसाठी सुपरफास्ट एक्सप्रेस गाडी नंबर १२११२ ही गाडी अत्यंत महत्वपूर्ण आहे. नाशिकमध्ये वास्तव्यास प्रवाशांची प्रचंड गर्दी बघुन डबे असलेल्या अमरावती वाढविणे फार गरजेचे होते.




काँग्रेसचे ओमप्रकाश गौड यांनी या गाडीचे डबे वाढवून मिळावेत यासाठी रेल्वेमंत्री अश्विनी कुमार वैष्णव आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी पत्रव्यवहार सुरू ठेवला.वारंवार पाठपुरावा करून त्यांनीरेल्वेमंत्री अश्विनी कुमार वैष्णव यांची भेटही घेतली. अखेर त्यांच्यासह इतरांकडून करण्यात येत असलेल्या पाठपुराव्याची दखल घेण्यात आली आहे. मुंबई अमरावती छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल सुपरफास्ट एक्सप्रेस आणि अमरावती - मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सुपरफास्ट एक्स्प्रेस या या गाडीला आणखी एक वातानुकूलित द्वितीय श्रेणीचा (सेकंड एसी) आणि चार अतिरिक्त शयनयान ( स्लीपर कोच) जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे त्यामुळे मुंबई अमरावती ( अंबानगरी ) सुपरफास्ट एक्सप्रेसला आता २२ डबे असतील. हा बदल कायमस्वरूपी करण्यात आला असून या डब्यांमधील जागांचे आरक्षणही उपलब्ध झाले असल्याचे सांगण्यात येते.

# भाषा ही आपली अर्जित संपत्ती आहे- कुलगुरू प्रा. कुमुर शर्मा यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२रिध्दपूर,**

भाषा ही आपली मिळवलेली संपत्ती आहे, म्हणून ती आपल्या हृदयाच्या जवळ आहे, ती आपला स्वाभिमान बनते. जेव्हा मी रिद्धपूरच्या भूमीवर श्री चक्रधर स्वामी आणि महानुभाव संप्रदायाचे कार्य पाहते तेव्हा मला जाणवते की महानुभाव संप्रदायाला मराठी भाषा आणि संस्कृतीचा किती अभिमान आहे. या संप्रदायाने ती जपण्याची आणि आपल्यात स्वाभिमान निर्माण करण्याची प्रतिज्ञा केली आहे. ही आपल्या सर्वांसाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे. श्री चक्रचर स्वामींनी आपले ज्ञान जपण्याचे इतके मोठे काम हाती घेतले आणि समाजाला खूप काही दिले, असे प्रतिपादन महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धाच्या कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा यांनी केले.

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा यांच्या सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी मराठी भाषा आणि तत्वज्ञान अभ्यास केंद्र, रिद्धपूर यांनी आयोजित केलेल्या महानुभावी सांकेतिक सकळ लिपीच्या अभ्यासावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात प्रा. कुलगुरू कुमुद शर्मा अध्यक्षीय भाषणात बोलत होत्या. उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून ऑनलाइन उपस्थित असलेले रिद्धपूर येथीलमराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. अविनाश अवलगावकर यांनी भाषणात सकळ लिपीचा अर्थ ओळख करून दिला आणि महानुभावी तत्वज्ञान आणि सकळ लिपीच्या विकासावर भाष्य केले. उद्घाटन समारंभाचे विशेष पाहुणे अखिल भारतीय महानुभावी परिषदेचे अध्यक्ष कविश्वर कुलाचार्य परमपूज्य करंजेकर बाबा म्हणाले की, आठशे वर्षांपूर्वी तयार झालेल्या आणि आतापर्यंत केवळ संतांनीच संशोधन आणि चिंतन केलेल्या लिपीचा समाज आता अभ्यास करत आहे याचा त्यांना आनंद आहे. सर्वज्ञ श्री



चक्रधर स्वामींनी आठशे वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या दौयात उल्कापातामुळे लोणार सरोवर निर्माण झाल्याचे भाकीत केले होते हे आज करंजेकर बाबांनी त्यांच्या भाषणात सांगितले. विशेष पाहुणे म्हणून उपस्थित असलेले विद्यापीठाचे निवासी लेखक डॉ. भूषण भावे यांनी रिद्धपूरच्या आध्यात्मिक आणि पवित्र भूमीला भेट हे आपले सौभाग्य मानले कार्यवाहक कुलसचिव कादर नवाज खान यांनी रिद्धपूर केंद्राच्या स्थापनेपासूनच्या विकासाबद्दल सविस्तर माहिती दिली. तत्वज्ञान आणि संस्कृती विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. जयंत उपाध्याय यांनी महानुभाव पंथाच्या महानतेबद्दल सांगितले. यावेळी आकाश गजभिये यांचा नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल कुलगुरूंनी सत्कार केला आणि विषयतज्ज्ञ म्हणून चक्रधर कोठी आणि विशाल हिवरखेडकर यांचा कुलगुरूंनी सन्मान केला.या कार्यक्रमात विशाल हिवरखेडकर लिखित 'श्री गोपीराज ग्रंथ संग्रहालय, हस्तलिखीत साहित्याची ग्रंथासूची' आणि सहायक प्राध्यापक डॉ. अनवर अहमद सिद्दीकी यांनी अनुवादित केलेल्या 'कर्मयोगी गाडगेबाबा एक युग प्रवर्तक' या पुस्तकांचे प्रकाशन आणि सकल लिपीवर आधारित भित्तीपत्रकाचे प्रकाशन कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा आणि कविश्वर कुलाचार्य पं. पं. करंजेकर बाबा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राचे स्वागत आणि परिचय रिद्धपूर केंद्राच्या प्रभारी आणि कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. नीता मेश्रामपांनी केले. उद्घाटन सत्राचे संचालन अनुवादक डॉ. स्वप्नील मून यांनी आणि आभार प्रदर्शन डॉ. नितीन रामटेके यांनी केले यावेळी सहयोगी प्राध्यापक डॉ. राजेश लेहकपुरे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. अनिकेत आंबेकर, सहायक प्राध्यापक डॉ. अनवर अहमद सिद्दीकी, सहायक प्राध्यापक डॉ. अनिकेत मिश्र, महंत गोपीराज बाबा, गुरुकुल आश्रम शाळेचे प्राचार्य संजय कोहले, सहाय्यक महेश राठोड. सफाई कामगार निखिल गजभिये, सुरक्षा रक्षक रवींद्र ठाकरे यांच्यासह पंकज हरणे, आकाश गजभिये, कुणाल हरणे, उज्वल गेडाम आदी उपस्थित होते. समारोप सत्र २१ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे माजी अध्यक्ष आचार्य प्रवर महंत नागराज बाबा उर्फ महंत गोपीराज बाबा हे या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी असतील. रिद्धपूर केंद्राच्या प्रभारी डॉ. नीता मेश्राम या प्रमुख पाहुण्या म्हणून तर तसेच संशोधन सहाय्यक चक्रधर कोठी व विशाल हिवरखेडकर उपस्थित राहणार आहेत.

# एक किमीचा प्रवास पण टोल तब्बल ९० रुपये!

## पुसला वाहनचालकांवर आर्थिक भुर्दंड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२वरुड (पुसला)**

७वरूड-पांढुर्णा महामार्गावरील पुसलानजीक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा टोलनाका सुरू झाल्यापासून स्थानिक वाहन चालकांवर अक्षरशः 'आर्थिक टोल' बसू लागला आहे. अवघ्या एका किलोमीटर अंतरासाठी तब्बल ९० रुपये मोजावे लागत असल्याने पुसला व परिसरातील नागरिकांत संताप उसळला आहे.पुसला गावातील मोठ्या संख्येने असलेले ट्रॅक्टर, मिनी ट्रक, जेसीबी व कार यांची दिवसातून अनेकदा ये-जा होत असते. शेतमाल वाहतूक, मजूर फेऱ्या आणि शेतीकामासाठी वारंवार प्रवास करावा लागतो. टोल नाका पलीकडे अनेकांची शेती असल्याने शेतकऱ्यांना दिवसातून २-३ वेळा टोल भरावा लागणे अपरिहार्य झाले आहे.दरवेळी ९० रुपये मोजावे लागत असल्याने वाहनचालक आणि शेतकऱ्यांवर आर्थिक भुर्दंड पडत आहे. त्यामुळे पुसला ग्रामपंचायतीने येथील चारचाकी वाहनांना टोलमुक्त करण्याची मागणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे केली आहे. अन्यथा नागरिकांना मोठा फेरा करून दुय्यम मार्गांचा उपयोग करावा लागतो, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे.टोल सुरू झाल्यानंतर केवळ पाच दिवसांतच नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून पुसला व आजूबाजूच्या गावांमध्ये टोलमुक्तीच्या मागणीला जोर चढला आहे.

### स्पर्धा परीक्षांच्या सरावा करिता अमरावती महानगरपालिकेचे एक पाऊल पुढे

# स्पर्धात्मक परीक्षांच्या सराव परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना भविष्याकरिता सक्षम करणार - आयुक्त सौम्या शर्मा




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२ अमरावती**

सध्याच्या स्पर्धात्मक युगात टिकायचे असल्यास स्पर्धा परीक्षांचा सराव व पायाभरणी बालवयापासूनच व्हावी या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौ सौम्या शर्मा यांच्या संकल्पनेतून शिष्यवृत्ती परीक्षांचे सराव वर्षभर व नियमित घेतले जाणार आहे.

वर्षभरात विद्यार्थ्यांच्या पाच सराव परीक्षा घेतल्या जाणार असून सराव परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धात्मक परीक्षांसाठी तयार केले जाणार आहे. अमरावती महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांकरिता पहिल्यांदाच हा नाविन्यपूर्ण उपक्रम होत असून यामुळे विद्यार्थ्यांचा स्पर्धात्मक परीक्षा करिता आत्मविश्वास वाढावा याकरिता प्रयत्न केले जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत नुकतीच मराठी हिंदी व उर्दू माध्यमाच्या इयत्ता पाचवी व आठवी मधील १३५० विद्यार्थ्यांची पहिली सराव परीक्षा अमरावती महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका संच व जचठ शीट या महानगरपालिकेच्या वतीने पुरविण्यात आल्या. तसेच ओपन लिंक फाउंडेशन सोबत झालेल्या करारानुसार सदर उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग करून विद्यार्थ्यांना विषय निहाय गुण तपासून कळविले जाणार आहे.

सोबतच विद्यार्थ्यांना फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी मार्गदर्शन सुद्धा या माध्यमातून केले जाणार आहे.

सदर उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्याच्या उद्देशाने अमरावती मनपा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपआयुक्त नरेंद्र वानखडे, शिक्षणाधिकारी प्रकाश मेश्राम, शाळा निरीक्षक योगेश पखाले , विनोबा टीम, सागर गजभिये (प्रकल्प अधिकारी), उत्कर्ष मेश्राम (प्रकल्प अधिकारी),रघुनाथ वानखेडे (कार्यक्रम व्यवस्थापक अमरावती विभाग), सहा.कार्यक्रम अधिकारी पंकज सपकाळ हे प्रयत्नरत आहेत .

# हव्याप्र मंडळाला हिंदी विद्यापीठ कुलगुरूंची सदिच्छा भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती,** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ वर्धा येथील कुलगुरू डॉ. कुमुद शर्मा यांनी प्रथमच श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला आपल्या शिष्टमंडळासह सदीच्छा भेट दिली. मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, सचिव प्रा. रविद्र खांडेकर, प्रा. दिपा कान्हेगावकर, डॉ. दिनानाथ नवाथे आदी पदाधिकाऱ्यांनी म. गांधी आतंरराष्ट्रीय विद्यापीठ वर्धाच्या शिष्टमंडळाचे स्वागत केले. हव्याप्र मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांच्या पुढाकार मध्ये कुलगुरू डॉ. कुमुद शर्मा, कुलसचिव कादर नवाज खान, एसो. प्रो. डॉ. जयंत उपाध्याय, रेसिडेंट रायटर डॉ. भूषण भवै, एम.ओ.यू. समन्वयक डॉ. अनिकेत अनिल आंबेकर और प्रोटोकॉल अधिकारी राजेश यादव या शिष्टमंडळाला मंडळाची ऐतिहासिक स्थापना, स्वातंत्र्य चळवळीमध्ये योगदान, क्रीडा क्षेत्रातील वाटचाल व विस्तृत परिसराची माहीती देण्यात आली. अनंत क्रीडा सभागृहातील जिम्नॅस्टिक, नेताजी सुभाषचंद्र



बोस क्रीडा सहभागृह, मेजर ध्यानचंद इंडोअर स्टेडियम, जलतरण विभाग, योग विभागसह शैक्षणिक विभागाला भेटी देत मंडळातील खेळ व शिक्षणाचा नियोजनबद्ध समन्वयाची माहिती घेतली. आतंरराष्ट्रीय विद्यापीठ एका मैत्रिपुर्ण समन्वयातून विद्यार्थी, खेळाडू व कर्मचारी यांच्या हितासाठी क्रीडा-शिक्षण समन्वयातून कार्य करू अशी इच्छा कुलगुरू डॉ. कुमूद शर्मा यांनी व्यक्त केली.मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृह येथे स्वागतपर सोहळ्याचे आयोजन करीत म. गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कुमूद शर्मा व शिष्टमंडळाचे स्वागत, सत्कार करण्यात आला.

### कुलगुरूंनी हाती घेतली रायफल...

शिक्षण क्षेत्रात सर्वोच्च पदावर असलेल्या कुलगुरू डॉ. कुमूद शर्मा यांना अखेर रायफल हातात घ्यावीच लागली. हा प्रसंग होता, श्री हनुमान व्यायाम प्रासरक मंडळातील रायफल शुटींग विभागातील भेटीचा. कुलगुरू डॉ. शर्मा व त्यांचे सोबत असलेल्या शिष्टमंडळाने शुटींग विभागाला भेट दिली. शुटींग चे विभागप्रमुख राहूल उगले यांनी कुलगुरू यांना रायफल व शुटींगची माहीती दिली.-

# फ्लॅट नावावर करावा, अन्यथा गोळी घालून ठार मारण्याची महिलेस धमकी

### गाडगेनगर पोलिसांनी दाखल केला गुन्हा : घटनेचा तपास सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती**

एका ५० वर्षीय व्यक्तीने लग्नाचे आमिष देवून अत्याचार केला. तसेच मोबाईलमध्ये आक्षेपार्ह व्हिडीओ घेवून व्हायरल करण्याची तसेच तुझा फ्लैट माझ्या नावाने कर, अन्यथा तुला व तुझ्या मुलीला गोळी मारून, दोघींचा मर्डर करेन, अशी धमकी त्याने दिल्याची तक्रार पिडीत महिलेने पोलिसांत दिली. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी संबंधित ५० वींद व्यक्तीकिष्द बलात्कार, धमकी देणे तसेच शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुरुवारी (दि. २९) गुन्हा दाखल केला आहे.

मंगेश सदाशिव खेडकर (५०, रा. मनसावली अपार्टमेंट, कांतानगर, अमरावती) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे.पोलिस तक्रारीनुसार, शहरातील कॅम्प भागात राहणाऱ्या एका ४० वर्षीय महिलेला मंगेश खेडकरने वर्ष २०१९ पासून लग्नाचे आमिष दिले, यातूनच शारीरिक शोषण केले. तसेच मंगेश खेडकरने मोबाईलमध्ये तक्रारदार महिलेचे आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. दरम्यान तो एक दिवस बंदूक घेऊन घरी पोहोचला. तिला जीवाने मारण्याची धमकी दिली. 'तुझा फ्लॅटमाझ्या नावाने कर, अन्यथा तुला व तुझ्या मुलीला गोळी मारून, तुमचा मर्डर करेन', अशी धमकी त्याने देत आहे. दिली. मागील सहा वर्षांपासून त्रास नोव्हेंबरला गाडगेनगर पोलिस ठाणे गातून मंगेश खेडकरविब्द तक्रार दिली. हा संपूर्ण घटनाक्रम पिडीत महिलेने पोलिस तक्रारीत नमुद केला आहे. आपली मानसिक, आर्थिक व शारीरिक फसवणूक केल्याचा आरोप महिलेने तक्रारीतून केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास गाडगेनगर पोलिस करत आहेत.

# निर्देशांच्या अडथळ्यामुळे तिवस्यात खरेदी केंद्र ठप्प; शेतकरी शेतमालासह परतले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ तिवसा**



स्थानिक बाजार समितीच्या आवारात असलेल्या सोयाबीन खरेदी केंद्राचे उद्घाटन २० नोव्हेंबर रोजी झाले. तालुक्यातील तीन शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीसाठी केंद्रावर आणले होते. परंतु, शेतमाल चाळणी करूनच घ्यावा, असे नाफेडचे सक्त निर्देश असल्याने याला शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला आणि आल्यापावली आपला माल परत नेला. यामुळे सोयाबीन खरेदी केंद्रावर पहिल्याच दिवशी सन्नाटा पसरला आहे.

यंदा अतिवृष्टीमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले. त्यातही जे पीक शेतकऱ्यांच्या हाती लागले, त्याची गुणवत्ता ढासळली. परंतु, एफएक्यू दर्जाचा माल म्हणजेच सर्वसाधारण मालाची खरेदी करावी, असे नाफेडकडून निर्देश असल्यानेतिवसा येथील बंद असलेले शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र शेतकऱ्यांचा नॉन एफएक्यू माल चाळणी करून घेण्यात येत आहे. यामधे शेतकऱ्यांच्या मालाची पूर्णपणे वाट लागत असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांनी या शासकीय खरेदी केंद्राकडे पाठ फिरवली आहे.१ नोव्हेंबरपासून आतापर्यंत ६५० शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी झाली आहे, तर २१०० शेतकऱ्यांनी ऑनलाइनकरिता आपल्या नावाची नोंद केली आहे. नाफेड ही भारत सरकारच्या कृषी मंत्रालयांतर्गत कार्य करणारी बहुराज्यीय सहकारी संस्था आहे. शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी कृषी उत्पादनांच्या विपणनाला प्रोत्साहन देणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. प्रत्यक्षात ही संस्था शेतकऱ्यांना नियमाच्या कचाट्यात पकडून आहे. आपल्याच उद्दिष्टांना हरताळ फासत आहे.

खरेदी-विक्री संघाकडून पत्रशासकीय खरेदीच्या जाचक अटी कायम राहिल्यास शेतकऱ्यांना सोयाबीन कवडीमोल भावात व्यापाऱ्याना विकावा लागणार आहे. तेव्हा शासनाने शेतकऱ्यांची अवस्था समजून घ्यावी व यावर तातडीने तोडगा काढावा, याकरिता खरेदी-विक्री समितीकडून जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांना पत्र देण्यात आले आहे.

**ग्रेडिंगनुसार खरेदी**

शेतकऱ्यांचा माल एफएक्यू दर्जाचा नसला तरी ग्रेडिंग करून मालाची वर्गवारी करण्यात यावी, अन्यथा सरसकट माल घेण्यात यावा, अशी मागणी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# आरोग्य केंद्राच्या नवीन इमारती : मात्र सुविधेचा अभाव
## आरोग्य विभागापुढे रिक्त पदे भरण्याचे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२तिवसा**





ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या सुविधेसाठी निर्माण केलेल्या आरोग्य केंद्र हे सध्या सलाईनवर असल्याचे पाहायला मिळत आहे. तिवसा तालुक्यात काही ठिकाणी नवीन आरोग्य केंद्राच्या इमारती उभारण्यात आल्या,मात्र या नवीन आरोग्य केंद्रात अनेक रिक्त पदे असल्यामुळे आरोग्य सुविधेचा अभाव असल्यामुळे नागरिकांना प्राथमिक आरोग्याच्या तपासणीसाठी तालुक्याच्या ठिकाणी पायपीट करावी लागत आहे. त्यामुळे इमारती झाल्या मात्र सुविधा केव्हा मिळणार असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जातो आहे.शासनाकडून मोफत आरोग्य सुविधा देण्याच्या मोठमोठ्या जाहिराती व घोषणा झाल्या मात्र तालुक्याच्या ठिकाणासह ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आरोग्य केंद्र,उपकेंद्रात कायमच आरोग्य सुविधा ढासळलेली दिसून येते. तालुक्यात सर्वाधिक लोक संख्या असलेल्या तीन गावात आरोग्य केंद्र आहे. यामध्ये कुऱ्हा, मार्डी, तळेगाव ठाकूर येथे आरोग्य केंद्रे असून तळेगाव ठाकूर विभागात एकूण ८ उपकेंद्रे,कुऱ्हा विभागात ७ व मार्डी विभागात ५ अशा एकूण २० उपकेंद्रातून या ठिकाणांहून तालुक्याला आरोग्यसेवा पुरवली जाते. परंतु या प्राथमिक आरोग्य केंद्रांत सोयी-सुविधा नसल्याने तसेच कर्मचार्यांची कमतरता असल्याने रुग्णांना लहानसहान उपचारासाठी देखील तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे शासनाने तातडीने रिक्त पदे भरून आरोग्य सुविधेला गती द्यावी अशी मागणी होत आहे.

**तालुक्यात ३१पदे रिक्त...**

तालुक्यात असलेल्या तीन आरोग्य केंद्रासह व उपकेंद्रात वैद्यकीय अधिकारी १, आरोग्य सहाय्यक पुरुष १, आरोग्य सहाय्यक महिला १ आरोग्य सेवक पुरुष ८, आरोग्य सेविका महिला ११ परिचर पुरुष ५, परिचर महिला १ व सफाई कामगार ३ अशी एकूण ३१ पदे रिक्त आहे.

# अंजनगांव सुर्जी तालुक्यातील सेवा सहकारी सोसायटी सचिवांच्या नियुक्त्या रखडल्या
## सेवा सहकारी सोसायटीच्या कामकाजावर परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अंजनगाव सुर्जी**




ग्रामीण विकासाची जननी म्हणून सहकार मोठ्या प्रमाणात नावारूपाला आल्यामुळे ग्रामीण भागाला बळकटीकरण देण्याचा प्रयत्न झाला. राज्यातील सेवा सोसायटी संस्थेच्या माध्यमातून झालेला ग्रामीण विकास हे जगातील अनेक देशांना एक दिशा देण्यासाठी निश्चितच उपयोगी ठरलेले आहे. शेतकऱ्यांसाठी शेतीसाठी आवश्यक असलेल्या विविध सेवा, सुविधा यांचा पुरवठा करणे यांसारखे अनेक उपक्रम राबविण्यासाठी गावांमध्ये सहकारी तत्त्वावर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्या उभ्या करण्यात आल्या असून या सोसाटीचा आणि शेतकऱ्यांचा वेळोवेळी मार्गदर्शन म्हणून कार्यरत सेवा सोसायटी सचिव कामकाजात पाहते. सोसायटीचे कामकाजात पाहत असताना अनेक सचिवांवर राजकीय दबाव राहत होता त्यामुळे राज्य शासनाने सचिवांनी मुक्त वातावरणात आणि पारदर्शक पद्धतीने कामकाजात चालावे यासाठी सचिवांचे संवर्ग ( कॅडर ) बनविण्याचा निर्णय घेऊन जिल्ह्यातील सचिवांच्या रिक्त जागेला भरण्याची परवानगी दिली.अमरावती जिल्ह्यातील सचिवांच्या एकुण १०५ जागा रिक्त होत्या त्यातील ९८ रिक्त जागा भरण्याच्या आदेश काढण्यात आला तर अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ७ सचिवांच्या रिक्त जागेचा आदेश थंड बस्त्यात पडला आहे त्यामुळे तालुक्यातील ३५ सेवा सहकारी सोसायटीच्या वसुलीच्या कामकाजावर परिणाम पडल्यामुळे सोसायटीच्या आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.


**नियुक्त्या राजकीय दबावामुळे रखडल्याचा आरोप**

अंजनगाव सुर्जी तालुक्यात सहकार क्षेत्रात दोन परस्परविरोधी गटांचे पॅनल आहेत. त्यातील परिवर्तन पॅनल च्या गटाच्या समर्थक असलेल्या सोसायटीच्या सचिवांची नियुक्ती रखडली असल्याने यात राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोप होत आहे.

जिल्हा उप. निबंधकाकडून फाईल आल्यावर आमच्याकडून सगळी प्रक्रिया झाली असून नियुक्ती पत्रांवर स्वाक्षरी केली आहे. नियुक्ती आदेशानंतर जिल्हा देखरेख अध्यक्षांकडे संबंधित सचिवांच्या तक्रारी असल्याने मीटिंगमध्ये ठरावाच्या माध्यमातून अध्यक्षांनी त्यांच्या अधिकार नुसार प्रकरण थांबून ठेवले आहे. येत्या काही दिवसांत सचिवांच्या नियुक्त्या प्रदान करण्यात येणार

**अनिरुद्ध राऊतमुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा देखरेख संस्था**

# निवडणूक प्रचारात डिजिटल क्रांती
## उमेदवारांची घोषणाबाजी जोमात मतदारांची उत्सुकता शिगेला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

काळ बदलतोय, तंत्रज्ञान पुढे जातंय आणि त्याचबरोबर निवडणूक प्रचाराचं स्वरूपही झपाट्याने बदलत आहे. पूर्वी कापडी बोर्ड, भिंतींवरील रंगीत पोस्टर आणि हात जोडलेल्या फोटोसह 'मला प्रचंड बहुमताने निवडून द्या' अशी साधी-सोपी विनंती करणारा प्रचार आज सोशल मीडियाच्या वेगवान पट्ट्यावर धावू लागला आहे. मोबाईल आणि समाजमाध्यमे आल्यापासून प्रचाराचे माध्यम आणि भाषाशैली यात मोठा बदल झाला असून, आता उमेदवारांना शब्दांची कोणतीही मर्यादा नाही.

फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅप स्टेटस, रील्स यावरून उमेदवार आपले संदेश जनतेपर्यंत पोहोचवत असून, आकर्षक स्लोगनने मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. सोशल मीडियावर रोज नवनवीन, आकर्षक आणि कधी कधी अतिशय भावनिक संदेशांची अक्षरशः रेलचेल दिसत आहे.

**व्हायरल घोषणाबाजीचा नवा ट्रेंड**

अलिकडे काही पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्यातील घोषवाक्ये लक्षवेधी ठरली आहेत. 'मै नेता नही सोच हू... आम्ही नवीन नेता नाही, तर नवा विचार आहोत!, आमचे ध्येय सत्ता नाही, परिवर्तन आहे, निर्धार विकासाचा, संकल्प विजयाचा, निवडणूक जिंकणं नव्हे, विभागाचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय.' अशा 'शब्द पेरणी'ने मतदारांचे लक्ष वेधण्याचा उमेदवारांचा प्रयत्न सुरू आहे.घोषवाक्ये आकर्षक आहेत, संदेश दमदार आहेत आणि सादरीकरणही आधुनिक. मात्र हे सगळे मतदारांना किती भावते, याचे उत्तर निवडणुकीच्या निकालानंतरच मिळणार आहे.

# श्री क्षेत्र नागरवाडी येथे श्री गाडगे महाराज मिशन मुंबईची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न
## महाराष्ट्रातील गाडगेबाबांचे सेवक श्री क्षेत्र नागरवाडीत





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२चांदूरबाजार**

निष्काम कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांचे अंतिम श्रद्धास्थान असलेल्या, श्री गाडगे महाराज संस्था श्रीक्षेत्र नागरवाडी येथे, स्वतः गाडगेबाबांनी स्थापन केलेली गाडगे महाराज मिशनची वार्षिक सर्वसाधारण सभा अतिशय सुनियोजनातून उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात यशस्वी रित्या पार पडली.यावेळी या वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित सर्व पदाधिकारी व संचालक महोदयांचे संस्थेच्या वतीने हरिनामाच्या गजरात पुष्पवर्षाव करीत हृदयस्पर्शी असे स्वागत करण्यात आले. दरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सिंहासनस्थीत संत गाडगेबाबांच्या मूर्तीचे पूजन व मल्यार्पण यावेळी करण्यात आले. प्रामुख्याने या वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित श्री गाडगे महाराज मिशन मुंबईच्या अध्यक्षा ड.यशोमती ताई ठाकूर यांनी सभेचे अध्यक्षही स्थान भूषविले. तसेच श्री गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष श्री.बापूसाहेब देशमुख, कार्याध्यक्ष तथा चेअरमन श्री.मधुसूदन दादा मोहिते पाटील, सचिव श्री.सचिन राजारामबापू घोंगटे पाटील, सचिव श्री. विष्णूभाऊ नाचवणे, खजिनदार श्री.अशोकराव पाटील, खजिनदार श्री.ज्ञानदेवराव महाकाळ पाटील, सनदी लेखापाल श्री.दिघे साहेब, कार्यकारी अधिकारी श्री.वाल्मीक जोरे, आदींच्या प्रमुख उपस्थितीत सभेची सुरुवात करण्यात आली. यावेळी विविध कार्योत्तर अहवाल, भविष्यातील सेवाभावी योजना, सामाजिक उपक्रमांची अंमलबजावणी यासह संस्थेच्या बळकटीकरणासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.सर्व संचालकांनी आपल्या विभागातील कार्याचा आढावा सादर केला आणि आगामी वर्षात राबवावयाच्या उपक्रमांवर मते व्यक्त केली.सरतेशेवटी उपस्थित सर्व पदाधिकारी व संचालक सदस्य व सेवकांना नागरवाडी संस्थेच्या वतीने सुंदर उबदार कम्फर्टर ब्लँकेट भेट स्वरूपात यावेळी देण्यात आले. यानंतर नागरवाडी इंद्रभुनाच्या निसर्गरम्य वातावरणात उपस्थित सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेत, या सभेची यशस्वी सांगता करण्यात आली.

# कार्यकर्ते सक्रिय; शोधू लागले नातेवाईक, ओळखीचे मतदार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत खांद्यावर हात ठेवून प्रचार करणार्या राजकीय पक्षांनी स्वतंत्र चूल मांडली आहे. कार्यकर्ते गोंधळले आहेत. तुमसरात नगरपालिकेची निवडणूक होत असली तरी ग्रामीण भागात निवडणुकीवरून चर्चा रंगल्या आहेत.

नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या याद्या राजकीय पक्षांनी घोषित केलेल्या आहेत. उमेदवार प्रचाराच्या कामाला लागले आहेत. कार्यकर्ते रिचार्ज झाले आहेत. ग्रामीण भागातील पक्षांचे कार्यकर्ते चर्चेत गुंतले आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांचा संपर्क थेट शहरात येत आहे. गावाकडे परतल्यानंतर सायंकाळी गावातील चौकात चर्चा रंगत आहेत. प्रचार आणि उमेदवार यांच्या संदर्भात चर्चा होत असल्यातरी चर्चेत सर्वच पक्षांचे कार्यकर्ते सहभाग घेत असल्याने आपल्याच पक्षांचे उमेदवार जिंकून येणार असल्याची ग्वाही देण्यात कार्यकर्ते पुढाकार घेत आहेत.

**शहरातील मतदार याद्या कार्यकर्त्यांच्या घरी**

शहरातील मतदार याद्यांची दुय्यम प्रत ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांच्या घरी पोहचल्या आहेत. या यादीत नातेवाईक मतदारांचे नाव शोधले जात आहे. याशिवाय गावातील किती नागरिक शहरात स्थिरावले त्यांचाही शोध घेतला जात आहे. सर्वच पक्षांनी निवडणूक जिंकण्यासाठी रणनीती तयार केल्याचे दिसून येत आहे.

# एचआयव्ही जनजागृतीत राष्ट्रीय सेवा योजना ठरतेय बरोबरीची भागीदार - डॉ.प्रा. मिलिंद काळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**



रेड रिबन क्लबच्या नोडल अधिकारी तसेच राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) कार्यक्रम अधिकारी व सदस्य यांची रेड रिबन क्लब कार्यप्रणाली आणि एचआयव्ही जनजागृती या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, अमरावती येथे १४ नोव्हेंबर रोजी संपन्न झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन राज्यसंपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी डॉ. प्रा. मिलिंद काळे यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आले. नवीन पिढी घडवण्यात प्राध्यापकांची भूमिका महत्त्वाची असून एचआयव्ही जनजागृतीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना ही बरोबरीची भागीदार आहे, असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावर असलेल्या जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांनी कोणतीही भूमिका बजावताना सर्वस्व ओतण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. विशाल गजभिये, प्रा. डॉ. मंदा नांदुरकर, बालरोगतज्ञ डॉ. संदीप दानखडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे, जिल्हा पर्यवेक्षक प्रकाश शेगोकार उपस्थित होते.कार्यशाळेत जिल्ह्यातील एचआयव्ही परिस्थिती, रेड रिबन क्लबची कार्यपद्धती, युवकांच्या लैंगिक समस्यांवरील मार्गदर्शन तसेच शासकीय-अशासकीय सेवांची माहिती देण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना स्वच्छता पुरस्कार प्राप्त डॉ. दीपक पाडेकर यांचा सत्कार करण्यात आला.राज्यभरातील विविध विद्यापीठांतील रा.से.यो. कार्यक्रम अधिकार्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

# अप्रुवल थेट जिनिंगमध्ये : सभापती सुनील पाटील गावंडे यांचा सीसीआयला कडक इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२दर्यापूर**

सी.सी.आय तर्फे कापूस खरेदीसाठी लागणारे अप्रुवल आता सचिवांच्या पूर्वपरवानगीने सात बाऱ्यावर असलेला पीक पेरा खरा असल्याचे हमीपत्र देऊन थेट जिनिंगमध्ये सुरू करण्यात आले आहे तरी ही प्रक्रिया फार उशिरा सुरू झाल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये मोठा गोंधळ निर्माण झाल्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे यांनी स्पष्ट केले.सी.सी.आयने तब्बल तीन महिन्यांपूर्वी कापूस नोंदणी प्रक्रिया सुरू केली होती. त्या वेळेलाच अप्रुवल देणे सुरू झाले असते तर आजची परिस्थिती निर्माण झाली नसती. दर्यापूर तालुक्यात ९० टक्के क्षेत्रात कपाशीचा पेरा असल्याने काही दिवसांत सर्वांना अप्रुवल देणे अशक्यप्राय होते. हा गोंधळ सीसीआयने पूर्वीच लक्षात घेणे आवश्यक होते, असा सूर सभापतींनी व्यक्त केला.

सभापती सुनील पाटील गावंडे यांनी शेतकऱ्यांना महत्त्वाच्या सूचना देताना स्पष्ट केले की, सीसीआय तर्फे कापूस खरेदी करताना कोणत्याही प्रकारची कट्टी लागत नाही. मोच्चर तपासून खरेदी केला जातो. व्यापारी किंवा मध्यस्थ कट्टी कापण्याचा प्रयत्न करत असतील तर शेतकऱ्यांनी ती कापू देऊ नये. सीसीआयचा दर हा पूर्णपणे शेतकऱ्यांना मिळायलाच हवा.तसेच, कापूस खरेदीदरम्यान शेतकरी व व्यापारी दोघांनाही समान न्याय मिळाला पाहिजे, कोणताही दुजाभाव सहन केला जाणार नाही, असा कडक इशारा त्यांनी दिला.

# निवडणुकांत रोजगाराच्या संधी दिवसाला ५०० रुपयांची कमाई

## मजुरांची मागणी : प्रचारपत्रक, झेंडे, रॅली, प्रचार सभांना गर्दी दाखवण्यासाठी वाढणार खटाटोप

अरुण जोशी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती



जिल्हात दहा नगर परिषदा व दोन नगरपंचायतीच्या निवडणुकीच्या तयारीने जिल्ह्यात राजकीय रणसंग्राम चांगलाच तापला आहे. येत्या २६ नोव्हेंबरपासून प्रचाराला थेट सुरुवात होणार असल्याने प्रचारासाठी रोजंदारी मजुरांची जोरदार मागणी वाढणार आहे. विविध पक्षांना रॅली आणि प्रचार सभांमध्ये गर्दी वाढवण्यासाठी तसेच झेंडे व प्रचारपत्रक वाटपासाठी मोठ्या प्रमाणावर मजुरांची गरज भासणार आहे. यातून मजुरांना हंगामी रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

नगर परिषद निवडणुकीमुळे हंगामी रोजगाराच्या संधी वाढल्या असून, रॅलीतील मजुरांना ४०० ते ५०० रुपये प्रतिदिन मजुरी मिळण्याचा अंदाज आहे. या रॅलींमध्ये महिला-पुरुषांबरोबरच गृहिणी आणि वृद्धांनाही काम मिळण्याची शक्यता असल्याने या हंगामी रोजगाराचा सामाजिक स्तरावर सकारात्मक परिणाम दिसून येणार आहे.जिल्ह्यातसर्वच राजकीय पक्ष स्वबळाचा नारा देत दंड थोपटून मैदानात उतरले आहेत. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट आणि शिवसेना यांच्यात सामना रंगणार आहे. ही निवडणूक आगामी विधानसभा निवडींसाठीही महत्त्वाची ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

**उमेदवारांचा थेट संपर्कावर भर**

उमेदवार आणि कार्यकर्ते मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी घरोघरी संपर्क, सभा, सोशल मीडिया, रॅली आणि रोड शो अशा अनेक माध्यमांच्या वापरावर भर देतात. सध्या तरी उमेदवारांनी थेट घरोघरी संपर्कावर जोर दिला आहे.

**यांनाही मिळणार निवडणुकांचा फायदा**

निवडणूक प्रचारामुळे फक्त मजुरांनाच नव्हे, तर स्थानिक छोटे व्यापारी, वाहनचालक, ध्वनी यंत्रणा ऑपरेटर, बॅनर-पोस्टर विक्रेते, केटरिंग सेवा, व्हिडिओग्राफर यासारख्या व्यवसायांनाही मोठ्या प्रमाणावर फायदा होतो. निवडणूक काळात यांचे उत्पन्न सरासरीपेक्षा दुप्पट वाढते, ज्यामुळे स्थानिक अर्थसंकल्पाला मोठा दिलासा मिळतो.

# २ डिसेंबरला लग्नाचा शुभमुहूर्त

## मतदान टक्क्यावर परिणामाची शक्यता

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती



२ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. मात्र, याच दिवशी अत्यंत शुभ असा विवाहाचा मुहूर्त असल्याने अनेक कुटुंबे विवाहसोहळ्यांच्या तयारीत गुंतणार आहेत. परिणामी, मतदार मतदान केंद्राकडे वळणार की लग्नसमारंभांकडे हा प्रश्न निर्माण झाला आहे.

'लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे मतदान. प्रथम त्यामुळे नागरिकांनी मतदानाचे कर्तव्य पार पाडून त्यानंतरच विवाहसोहळ्यांकडे वळावे. यासाठी पहिले मतदान... मग लग्न' आणि तुमचे एक मत बदलू शकते भविष्य यासंदेशांसह व्यापक जनजागृती मोहीम सुरू करण्यात येत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे २ डिसेंबर ही तारीख एकाचवेळी लोकशाही आणि परंपरेची कसोटी ठरणार आहे.सामाजिक संस्था आणि स्थानिक नेते नागरिकांना आवाहन करत आहेत की, विवाह सोहळ्याला जाण्यापूर्वी सकाळीच मतदान करून हक्क बजवावा. काहींनी सकाळी ७ वाजता कुटुंब, नातेवाइकांसह मतदान केंद्रावर जाण्याची तयारी केली आहे. मात्र, ज्यांचे विवाह गावाबाहेर आहेत त्यांना पहाटे निघावे लागणार असल्याने काही ठिकाणी मतदान टक्केवारीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**मतदान की विवाह, कोणाला प्राधान्य?**

मतदान टाळल्यास उमेदवार निवड आणि लोकशाहीच्या भविष्यावर होणारा परिणाम गंभीर ठरू शकतो. मतदान हा केवळ अधिकार नाही, तर जबाबदारी आहे. त्यामुळे अनेक नागरिकांनी प्रथम मतदान, नंतर मंगलकार्य असा निर्धार व्यक्त केला आहे.

**विवाहाचा हंगाम आणि गावाबाहेरील गर्दी**

स्थानिक लग्न समारंभ मंडळे, हॉल व्यावसायिक आणि भोजन व्यवस्था करणारे सांगतात की, २ डिसेंबर हा हंगामातील सर्वाधिक मागणी असलेला शुभ दिवस आहे.अनेक कुटुंबे विवाहासाठी गावाबाहेर जाणार असल्याने पाहुण्यांची ये-जा, वरात व्यवस्था आणि समारंभातील धांदल यामुळे मतदानासाठी वेळ मिळणे कठीण ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे मतदानाचा टक्का घसरु शकतो.

## बिनविरोध विजयानंतर आल्हाद कलोती यांची नवनीत राणा यांच्याकडे भेट

विदर्भ प्रजासत्ताक दि.२२चिखलदरा

चिखलदरा नगरपरिषद निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाऊ आल्हाद कलोती हे बिनविरोध विजयी झाल्यानंतर त्यांनी प्रथमच गंगा सावित्री निवासस्थानी भेट देत भाजप नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांची भेट घेतली.



या भेटीदरम्यान नवनीत राणा यांनी शाल व श्रीफळ देऊन कलोती यांचे स्वागत केले तसेच त्यांच्या बिनविरोध विजयानिमित्त अभिनंदन केले. पुढील काळातील यशस्वी कामकाजासाठी त्यांनी शुभेच्छाही दिल्या.यावेळी निलेश कुलकर्णी, जयंत वानखेडे, पुरुषोत्तम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# आ. रवी राणांच्या दबावाला काँग्रेसची 'अंडरग्राउंड' रणनीती - सर्व उमेदवार अज्ञातस्थळी हलविले

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२चिखलदरा



नगरपरिषद निवडणुकीत नामांकन मागे घेण्याच्या अंतिम दिवशी चिखलदऱ्यात पुरते राजकीय वारे उलटसुलट वाहू लागले. प्रभाग क्रमांक १० मध्ये काँग्रेसच्या एका उमेदवाराने गुरुवारी नामांकन मागे घेतल्यानंतर शुक्रवारी पुन्हा काही उमेदवार 'संपर्कात' आल्याची चर्चा रंगली. या चर्चेमुळे काँग्रेस गोटात चांगलीच खळबळ उडाली. पक्षाच्या शीर्ष नेत्यांनी तात्काळ चिखलदऱ्यात तळ ठोकला आणि 'नो रिस्क' म्हणत सर्व उमेदवारांना अज्ञात स्थळी हलविण्याचा निर्णय घेतला.

शुक्रवारी दुपारी १ वाजता विविध वाहनांतून नगराध्यक्ष पदासह एकूण २० उमेदवारांना सुरक्षित ठिकाणी रवाना करण्यात आले. परतवाडा परिसरात सर्वांनी जेवण उरकले. नामांकन मागे घेण्याची मुदत संपेपर्यंत उमेदवारांना गुप्तस्थळीच ठेवण्यात आले. वेळ टळल्यानंतरच सर्व उमेदवारांना पुन्हा चिखलदऱ्यात परत पाठवण्यात आले. त्यामुळे शुक्रवारी काँग्रेसचा एकही उमेदवार 'फुटला' नाही.

तथापि, या संपूर्ण परिस्थितीत आ. रवी राणा यांची 'दहशत' काँग्रेसमध्ये स्पष्टपणे जाणवत असल्याची चर्चा दिवसभर राजकीय वर्तुळात रंगली. सात उमेदवार संपर्कात असल्याच्या अफवांनी वातावरण चांगलेच ढवळून निघाले होते. खा. बळवंत वानखेडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी आमदार राजकुमार पटेल यांच्यासह वरिष्ठ नेते दिवसभर चिखलदऱ्यात तळ ठोकून परिस्थितीवर नियंत्रण ठेवताना दिसले.चिखलदऱ्यातील निवडणूक वातावरणाने शुक्रवारी ताण-तणावाचा उच्चांक गाठला. 'राणा फॅक्टर'मुळे काँग्रेसला उमेदवारांना एका दिवसासाठी सुरक्षित ठिकाणी ठेऊन निवडणूक बचाव कार्य करावे लागले-हे संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरले.

**खासदार पोहोचले सकाळी, पटेल मुक्कामी**

आ. रवी राणा यांनी मुख्यमंत्र्यांचे मामेभाऊ आल्हाद कलोती रिंगणात असलेल्या पांढरी प्रभाग १० मधून दोन अपक्ष व काँग्रेसच्या इरशाद शेख जमीन यांना नामांकन मागे घ्यायला लावण्यात प्रमुख भूमिका बजावली. त्यामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली. गुरुवारी दुपारपासूनच माजी मंत्री यशोमती ठाकूर व बबलू देशमुख यांनी चिखलदऱ्यात तळ ठोकून मोर्चा सांभाळला. माजी आमदार राजकुमार पटेल रात्र मुक्कामी थांबले. शुक्रवारी सकाळीच खा. बळवंत वानखडे देखील तेथे पोहोचले.

**चला, डबा पार्टी करू**

राज्यात चर्चेत आलेल्या चिखलदरा नगरपालिकेमध्ये नगरसेवकांना दहशतीत आणून त्यांचे नामांकन मागे घेतले जात असल्याचा आरोप माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी केला.पुन्हा राणांच्या गळाला नगरसेवक लागू नये म्हणून खा. बळवंत वानखडे यांनी सर्व नगरसेवकांना धीर देत डबा पार्टीसाठी नेले. यानिमित्त निवडणुकीपूर्वी नगरसेवकांची सहल घडली.

# चिखलदऱ्यात आशियातील तिसऱ्या क्रमांकाच्या भव्य स्कायवॉकचे काम वेगात

## आमदार रवी राणा यांनी केली पाहणी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२चिखलदरा



विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदऱ्यात उभारल्या जात असलेल्या आशियातील तिसऱ्या क्रमांकाच्या भव्य स्कायवॉक प्रकल्पाच्या कामाची पाहणी बडनेरा विधानसभा क्षेत्राचे आमदार रवी राणा यांनी आज प्रत्यक्ष स्थळी जाऊन केली. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बांधल्या जात असलेल्या या स्कायवॉकमुळे चिखलदराच्या निसर्गरम्य दरीचे अनोखे दर्शन पर्यटकांना मिळणार असून, पर्यटन क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून त्याची नोंद होणार आहे.या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष सहकार्य लाभले असून, केंद्रीय स्तरावर भाजपा नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याने प्रकल्पाला गती मिळाल्याचे आमदार राणा यांनी सांगितले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्कायवॉकचे काम अंतिम टप्प्यात असून पुढील चार महिन्यांत हा प्रकल्प पर्यटकांसाठी सुरू करण्याचे नियोजन आहे.या स्कायवॉकमुळे चिखलदऱ्याचे विदर्भातील पर्यटन नकाशावरील महत्त्व अधिक दृढ होणार आहे. सुरक्षित, रोमांचक आणि भव्य अनुभव देणारा हा स्कायवॉक चिखलदऱ्याचे वैभव अधिक उजळवणार असल्याचे आमदार राणा यांनी नमूद केले. पर्यटनवृद्धीसोबतच स्कायवॉक परिसरात स्थानिकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार असून, चिखलदऱ्यातील तरुणांसाठीही नवे मार्ग खुलणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.स्कायवॉकच्या उभारणीमुळे चिखलदरा हे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटनाच्या दृष्टीने अधिक आकर्षक ठिकाण ठरेल, तसेच विदर्भातील निसर्ग पर्यटनाला मोठी चालना मिळेल, असेही राणा यांनी सांगितले.यावेळी राजेंद्र सोमवंशी, आल्हाद कलोती, राजेश मांगलेकर, अनवर हुसेन, वेंदात सुरपाटने, निलेश कुलकर्णी, गुरु ठाकुर सोमवंशी, जितू पचोरी, तिलक मिश्रा, सुरज तिवारी आदी मान्यवर उपस्थित होते.

# बावनकुळे यांच्या टीकेवर ठाकूरांचा पलटवार तुमच्या घरात काय सुरू आहे ते आधी बघा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती




भाजप नेते व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस नेतृत्वातील एकोपा अभावी टीका करत काँग्रेसचे नेते एकमेकांकडे पाहत नाहीत असे वक्तव्य केले होते. या टीकेला अमरावतीतील काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी जोरदार पलटवार केला.ती म्हणाल्या, बावनकुळे साहेब हास्यास्पद बोलत असतात. खुदके गिरे बाण में झाँक के देखो क्या हो रहा है जिनके घर शीशे के होते हैं, वो दूसरों के घरों पर पत्थर नहीं फेंकते.महाराष्ट्रात महायुतीतच अंतर्गत मतभेद सुरू असल्याचा आरोप करत ठाकूर म्हणाल्या, शिंदे साहेब फडणवीसांकडे पहात नाहीत, हुतात्मा चौकातच कोण कुणाकडे पाहत नव्हतं. कूबड्या कोणाला म्हणतात ते आधी पाहा. महाराष्ट्राचा खेळखंडोबा भाजप-शिंदे गटाने घातला आहे.त्यांनी भाजप आणि बावनकुळे यांच्यावर जोरदार टीका करत, तुम्ही आधी तुमच्या घरात काय सुरू आहे ते बघा, असा घणाघात केला.

# अमरावतीमध्ये अखेर सहा पालिकांमध्ये महायुतीचे विसर्जन; शिंदे गटाची नाराजी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती

नगर पालिका, नगर पंचायतींच्या निवडणुकीसाठी काल नाट्यमय घडामोडीनंतर अर्ज माघारीवर अखेर पडदा पडला. जिल्ह्यातील सहा नगरपालिकांमध्ये भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिंदे सेनेने महायुतीचे विसर्जन करून एकमेकांसमोरच आव्हान उभे केल्याचे चित्र आहे.

चिखलदरा नगरपालिकेत दोन दिवसांपुर्वीच मोठी उलथापालथ होऊन राजकीय समीकरणे बदलली. चिखलदरा येथे भाजपकडून फटका बसूनही राष्ट्रवादी अजित पवार गटाने दर्यापुरात भाजपसोबत युती केली. दुसरीकडे, महाविकास आघाडी देखील दुभंगल्याचे दिसून आले आहे.

दर्यापूरमध्ये भाजपने राष्ट्रवादीसोबत युती केली असली, तरी शिंदे गटाने भाजपच्या विरोधात उमेदवार दिला आहे. या ठिकाणी भाजपच्या उमेदवार नलिनी भारसाकळे यांच्या विरोधात शिंदे सेनेने प्रदीप मलिये यांना उमेदवारी दिली आहे. या ठिकाणी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गट देखील रिंगणात असल्याने बहुरंगी लढतीची चिन्हे आहेत.

अंजनगाव सुर्जी नगरपालिकेतही महायुतीत फूट पडली आहे. भाजप आणि शिंदे गट हे एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. शेंदूरजनाघाटमध्ये भाजप आणि शिंदे गट समोरा समोर आले आहेत. अचलपूरमध्ये देखील भाजपसमोर शिंदे सेनेच्या उमेदवाराचे आव्हान आहे. अचलपूरमध्ये भाजपच्या रुपाली माथने यांच्या विरोधात



शिंदे गटाच्या रेखा गड्रेल या रिंगणात आहेत. जिल्ह्यातील सर्वात मोठ्या नगरपालिकेत काँग्रेस, प्रहार, एमआयएम सह अपक्ष उमेदवारही रिंगणात आहे. या ठिकाणी बहुरंगी लढतीचे चित्र आहे.चांदूरबाजार नगरपालिकेत अध्यक्षपदासाठी सात उमेदवार रिंगणात आहेत. त्यातही भाजपच्या उमेदवारासमोर राष्ट्रवादी अजित पवार गटाने आव्हान उभे केले आहे. काँग्रेस आणि प्रहारने या ठिकाणी चूरस निर्माण केली आहे.

धामणगाव रेल्वे, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर या नगरपालिकांच्या नगराध्यक्षपदाची निवडणूक लक्षवेधी ठरली आहे. धामणगावात भाजपचे आमदार प्रताप अडसड यांच्या भगिनी अर्चना रोठे-अडसड या रिंगणात आहेत. अंजनगाव सुर्जीत शिवसेना ठाकरे गटाचे आमदार गजानन लवटे यांचे पुत्र यश लवटे हे उमेदवार आहेत. तर दर्यापूरमध्ये अकोटचे भाजपचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या पत्नी नलिनी भारसाकळे यांच्यासमोर त्यांच्यात जाऊ काँग्रेसच्या उमेदवार मंदाकिनी भारसाकळे यांचे आव्हान आहे.

काँग्रेस आणि भाजपमध्ये प्रमुख सामना असला, तरी काही ठिकाणी शिवसेना ठाकरे आणि शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार आणि शरद पवार गट तसेच आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार पक्षाचाही प्रभाव असल्याने ही निवडणूक रंगतदार बनली आहे. धामणगावात भाजप आणि काँग्रेसमध्ये थेट लढत होणार आहे. चिखलदरा येथे तिरंगी लढत आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत